नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

१९४९.

ज. कानेटकर
श्री. मंगरूळकर
यणराव शेंडे
ंतराव लुले
उषाबाई गद्रे
★
ल. अडोणी
वा. पडोळे
ग्रांवकर
त दर्शी

पा वार्ता
कामना, इ. इ.

८ आणे

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक
वामन कृष्ण चोरघडे

अनुक्रमणिका

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याकडून लायब्ररयांसाठी मंजूरी मिळालेलें.

यु ग वा णी

डि सें ब र १ ९ ४ ९

अ नु क्र म णि का

पत्रव्यवहाराचा पत्ता—यु ग वा णी का र्या ल य

वझालवार कॉलनी, धरमपेठ, नागपूर.

वर्धा शिक्षण

वामन कृष्ण चोरघडे

या योजनेसंबधी चर्चा पुष्कळ झाली. शिक्षणशास्त्रज्ञांनी उलटसुलट, पारखून जोखून ही योजना अव्यवहार्य आहे असें सिद्ध करून दिलें. आतां त्या योजनेतील मूलभूत तत्वें मान्य केलीं गेलीं व त्याप्रमाणे निरनिराळ्या प्रांतांतून शिक्षणाचे प्रयोग सुरू आहेत ही गोष्ट वेगळी. या योजनेला उचलून धरावयास सार्जंटसाहेब पुढे आले नसते, तर कुणास टाऊक शिक्षणशास्त्रज्ञांनी आपलें म्हणणें मागें घेतलें असतें की काय ? सार्जंटसाहेब रंगाने गोरे होते आणि शिक्षणशास्त्रज्ञहि होते. या योजनेवर मुख्य आरोप असा होता की ही योजना गांधींची आहे आणि गांधींना शिक्षणविषयक कोणतीहि पदवी नाही. जणूकाय शिक्षणशास्त्रावरील बुकें वाचल्याशिवाय नवे विचार कुणाला सुचणें शक्य नाही. प्रश्न असा आहे की ज्यांनी ज्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रांत नवविचारांची पेरणी केली त्यांपैकी त्या त्या विषयांत ते तज्ञ होते काय ? जीवनांत ज्यांना रस आहे, तें सुखी व्हावें अशी ज्यांची मागणी आहे आणि तें सुखी करण्यासाटी आवश्यक तो त्याग व सेवा करण्याची ज्यांची तयारी आहे त्यांना नवविचार मांडण्याचा अधिकार आहे. आणि विचारांचें नाविन्यहि त्यांच्याचजवळ आहे. कारण असे पुरुष नेहमी अशान्त दृष्टीने विचार करतात की जीवन सुखी करण्यासाटी जीं अनेक साधनें आहेत तीं कामाचीं आहेत कीं बेकामाचीं आहेत, उपयोगी आहेत कीं निरुपयोगी आहेत ! शिक्षणशास्त्रज्ञांचें असें असतें की ते शिक्षणशास्त्राचा अभ्यास करून त्याखालींच दडपून जातात आणि ज्यासाटी आपण रक्त आटवून अभ्यास केला त्या तत्वांबद्दल त्यांना मोहहि होतो. जिने स्वयंपाक केला ती बाई शिळपाकेंहि आपली मेहेनत वायां जाऊ नये म्हणून खपवून टाकील. डॉक्टर असें करण्याचा सल्ला अर्थातच देवूं शकणार नाही. शिक्षणतज्ञांच्या या पुस्तकी ज्ञानाला उत्तर देण्यासाटी आचार्य कृपलानींनी वर्धा शिक्षण योजनेवर जें पुस्तक लिहिलें त्याचें नांवच मुळी 'गांधीचें नवें खूळ' आहे. पुस्तक अर्थातच सुंदर, सुबोध व वाचनीय आहे.

जीवनाचे प्रयोग करतांनाच गांधीजींची शिक्षणाकडे दृष्टि वळली आणि त्यांना आजच्या शिक्षणपद्धतीच्या भाराभर पसाऱ्याचें वैगुण्य दिसूं लागलें. तें वैगुण्य दोन प्रकारचें होतें. एक, मनावर होणाऱ्या संस्कारांचें व शिक्षणाच्या परिणामाचें. आजच्या शिक्षणाचा आमच्या परंपरेला अनुसरून संस्कार करण्यासाटी खरोखरच कांही उपयोग नाही आणि शिक्षणाचें फळ कांहींना नोकरी व इतरांना

अक्षरज्ञान यांशिवाय दुसरें नाही. "जी विद्या मुक्त करते तीच विद्या खरी. ज्या विद्येने राम मिळतो तीच विद्या योग्य," हें कबूल असलें तरी ऐहिक जीवन सुखी करण्याकरता विद्येचा उपयोग आहे, हें नाकबूल करतां यावयाचें नाही. आम्ही आजच्या शिक्षणांत वाचतों की, 'आठव्या हेनरीला आठ बायका होत्या. त्याला रुचकर व भरपूर खाण्याचा सोस होता. "औरंगजेबाने आपल्या बापाशी आणि भावांशी निर्दयपणाचें वर्तन केलें होतें.' या ज्ञानाचा संस्काराच्या दृष्टीने तसें पाहिलें तर काय उपयोग आहे! मोठ्यांच्या गोष्टी ऐकून मोठ्या कल्पना फार तर डोक्यांत येतील पण ज्यायोगे जीवनावरील श्रद्धा वाढेल असें कांहीच पदरांत पडत नाही. जें दुसऱ्याने करावें असें आपणांस वाटतें तें आपण करीत नाही. जणुं "वाटण्याचें" काम आपलें व करण्याचें तेवढें इतरांचें अशी कल्पना प्रसृत होते.

गांधींनी या देशाचा कारभार हातीं घेतला तेव्हांपासून पुस्तकांत पाहाण्या-ऐवजी जीवनांत कांही अर्थ सांपडतो की काय याचें संशोधन केलें. ज्या देशांतील असंख्य लोक उपाशी राहातात, तो देश 'जीवन आणि शिक्षण' वेगवेगळें करूं शकणार नाही हें लक्षांत यावयास त्यांना वेळ लागला नाही. "कांही दिवस नुसतें शिकावें आणि नंतर जगावें" असें आजचें शिक्षण सांगतें. आजच्या शिक्षणांत 'जगणें' येत नाही आणि आजच्या जगण्यांत 'शिक्षणहि' येत नाही. जगतां जगतां मनुष्य जें शिकतों तेंच त्याचें खरें शिक्षण होतें. अनुभवाच्या शाळेचा महिमा जो गायिला आहे तो याच अर्थाने. यापेक्षा कोणतीहि शिक्षणाची प्रक्रिया ही निसर्गाविरुद्धच समजली पाहिजे. कळीचें फूल होतें तें तिच्या सर्वांगाचा विकास होत होतच. लहान मूल वाढत असतें तेंहि त्याच्या सर्वांगाची प्रगति होत होतच. या देशाला नुसतें शिकणें परवडणार नाही हें ओळखल्यानंतर शिकतां शिकतां जगतांहि येईल अशी योजना करणें अपरिहार्य होतें. ज्यावेळेला जें ज्ञान हवें, व जीं साधनें हवीं त्यावेळेला त्यांची उपलब्धि झाली तरच उपयोग! माणसाला चालण्यासाठी पांगुळगाडा दिलेला हास्यास्पदच ठरेल. जीवन-शिक्षणाचें उत्कृष्ट उदाहरण भगवत्गीतेचें होय. गीता रणांगणांत दोन्ही सैन्यें समोरासमोर उभीं असतांना सांगितली गेली व म्हणूनच ती उपयुक्त ठरली. 'शिक्षणाकरतां शिक्षण' हें कधी असूंच शकत नाही. तें जीवनाकरतांच असलें पाहिजे. जीवनावर श्रद्धा असणारेच हें ओळखूं शकतात. स्वयंपाक्याला पाक-सिद्धि कशी करावी, हें फार तर सांगता येतें. स्वयंपाक काय करावा, हें सांगण्याचें काम त्याची मजुरी चुकविणाऱ्या मालकाचें असतें. या देशाचें 'स्वराज्य' ब्रिटिशांच्या राजनीतीचा कीस पाडणाऱ्यांनी मिळविलें नाही. तें मिळविलें या देशांतील लोकांची स्थिति व अिच्छा अचूक जाणणाऱ्यांनीच. शिक्षण क्षेत्रांत नवे विचार देण्याचें श्रेय 'रूसोला' मिळालें हें अेका महान गोष्टीचें द्योतक आहे. रूसो शिक्षणपंडित नव्हता व म्हणूनच त्याला कांही नवें सांगता आलें. रूसोने जें सांगितलें त्यांवर अितर तज्ञांनी विचार केला आणि त्याला शास्त्रज्ञांनी शास्त्रीय स्वरूप दिलें. जे नवे विचार आज शिक्षणशास्त्रांत प्रचलित आहेत तेहि

शिळे झाले आहेत. कारण जीवन नदीसारखें आहे. ज्या साधनांनी अेका विशिष्ट ठिकाणच्या प्रवाहाचें पात्र उल्लंघिता येतें तींच साधनें पुढच्या प्रवाहांत उपयोगी पडतील असें नाही.

या सर्व गोष्टींचा विचार करूनच गांधीजींनी 'वर्धा-शिक्षण योजना' तज्ञांसमोर मांडली. वर्धेला आक्टोबर १९३७ च्या २२-२३ तारखेला जी परिषद भरली होती तिने अगदी थोडक्यांत खालील तत्वें ठरावाच्या रूपाने मान्य केलीं होतीं—

(१) राष्ट्रीय प्रमाणावर वयाच्या ७ वर्षेपर्यंत शिक्षण सक्तीचें व मोफत असावें.

(२) शिक्षणाचें माध्यम मातृभाषा असावें.

(३) उत्पादक व परिस्थितीला मानवणारी अशी हस्तकला निवडून तिच्या द्वारें शिक्षण द्यावें. यांत हस्तकलेला प्राधान्य आहे आणि शिक्षणाचें साधन मान्य केलें गेलें आहे.

(४) शिक्षकाचें वेतन विद्यार्थ्यांच्या कमाअींतून दिलें जावें.

(५) शिक्षणासाठी जी कला निवडली असेल ती साध्य व साधन समजली जावी.

(६) विद्यार्थ्याने ती हस्तकला साध्य करून घेतांना जें उत्पादन केलें असेल त्याच्या मागणीची जबाबदारी सरकारवर असावी. सरकारने कर्तव्य म्हणून शाळेची जागा, अिमारत, उपकरणें पुरवावींत.

वरवर पाहिलें तर हे सर्व ठराव अगदी साधे व सामान्य वाटतात. म्हणूनच त्यांच्याविरुद्ध हाकाटी केली गेली आहे. ज्यांवर जीवन उभारलें जातें तीं तत्वें नेहमी साधीं व सामान्यच असतात. जरा खोलवर विचार केला तर शैक्षणिक क्रान्तीला हीं तत्वें किती आवश्यक आहेत याची कल्पना येअील. शिक्षण ज्या हस्त-कलेच्या द्वारें द्यायचें ती कला पोट भरूं शकेल अशी निवडायची, हें वर्धा-शिक्षणयोजनेचें अत्यंत महत्वाचें तत्व आहे व मानसशास्त्राच्या दृष्टीने तें समर्थनीय पण आहे. जी हस्तकला पोट भरायला उपयोगी नाही तिच्याद्वारें संपूर्ण शिक्षण मुळीच देतां यायचें नाही आणि या देशाला ती परवडणारहि नाही. शिक्षणाच्या अेका पद्धतींत अेक विशिष्ट उद्देश निवडला जातो व तो सिद्ध करीत असतांना शिक्षणाचे संस्कार केले जातात. उदा: अेक वर्ग असें ठरवितो की आपण घर बांधावयाचें. त्या घराला जें जें आवश्यक असेल तें तें मिळवायचें व त्या प्रयत्नाला अनुलक्षून जे जे विषय येतील ते सर्व विद्यार्थ्यांना शिकवायचे किंवा त्यांनी शिकावयाचे. अितकें सगळें झाल्यानंतर तें घर राहाण्याच्या उपयोगी जर येणार नसेल तर तद्वारा मिळालेलें सर्व शिक्षण मनोरंजनाच्या दृष्टीने सफल झालें तरी व्यवहाराच्या दृष्टीने निरुपयोगीच ठरणार. लहान मुली भातुकलीचा खेळ खेळतात आणि अेकाच पदार्थाचें नांव बदलून बदलून अनेक पदार्थ करतात.

त्या खेळाने पोट भरत नाही आणि तो संसारहि लुटुपुटीचाच ठरतो. या पद्धतीचें समर्थन करणारे मुलांच्या वतीने मोठा कळवळा दाखवितात. ते म्हणतात "मुलांना कोंवळ्या वयांत जीवनसंग्रामाची आंच कशी सहन होईल? पुढे तर लढावयाचेंच आहे." पण असें म्हटलें म्हणजे मुलांचा कळवळा व्यक्त होतो आणि याच्या उलट म्हटल्याने मुलांशी निर्दय होण्यासारखें होतें असें नाही. प्रश्न तत्वाचा आहे. जीवनाला संग्राम मानलें तर ज्यांना ज्यांना जगावें लागतें त्यांना त्यांना लढावें लागेलच. मग मुलांनाच खोट्या तरवारी देऊन कसें चालेल? शिक्षणाचीं साधनें नेहमी खरीं असलीं पाहिजेत. लुटुपुटीचीं असतां कामा नये. आपल्याकडे पूर्वी बालविवाहाची प्रथा असे आणि मुलगी बारा वर्षांची झाली की तिचें लग्न होत असे. मुलीची आओी तिला सासरी पाठविण्याच्या अगोदर तिच्याकडून सर्व कामें करवून घेत असे. आठव्या वर्षी तिला विस्तवाशी 'खेळविण्यांत' येअी आणि बारा वर्षांची होओीस्तवर दहा माणसांचा स्वयंपाक करण्याअितपत तिला तरबेज करण्यांत येअी. विस्तवाचा खेळ मुलीच्या 'कळवळ्याने' लांबणीवर टाकला तर मुलीला कधीहि स्वयंपाक यावयाचा नाही अशी मातेची खात्री असे आणि आपल्या मुलीचें हित व्हावें म्हणूनच ती सर्व शिकवीत असे. आओीचें प्रेम शिक्षणतज्ज्ञांच्या मुलावरील प्रेमापेक्षां कमी होतें असें तर यामुळे कोणाला म्हणतां येणार नाही ना? हस्तकला पोटाला भाकर मिळवून देण्याअितकी खरीखुरी असावी, या मागील तत्व आणि रहस्य हेंच आहे. अेक गृहस्थ पोहायला शिकत होते. पाण्यावर तरंगता यावें म्हणून ते भोपळ्याची सांगड बांधीत व त्यामुळे अथांग पाण्यांत निर्भयपणे हातपाय हालवीत. पण ती सांगड सोडून पोहण्याची त्यांना भीति वाटे. म्हातारपणींसुद्धां ते सांगड बांधूनच पोहत. कधी ना कधी बुडण्याची जोखीम पत्करावी लागते तेव्हांच तरंगण्याची आशा असते. हें साधें तत्व जीवनांत बुडण्याच्या भीतीमुळे त्या सद्गृहस्थांना शिकतां आलें नाही. आजच्या शिक्षणतज्ज्ञांचें असेंच कांहीसें होतें.

"वर्धा-शिक्षण-योजना" ही अनेक प्रयोगानंतर उत्क्रान्त झालेली योजना आहे. तिच्यांत तपशिलाचे दोष असतील. मूलभूत तत्वाला खोट नाही. गांधींना तें तत्व सुचलें तें येथील परिस्थितीचा विचार करून पण शिक्षणशास्त्रज्ञांनी त्या तत्वाचें समर्थन केलें तें शैक्षणिक दृष्टीने विचार करून. चाळीस कोटी लोकांना शिकविणें हें सोपें काम नाही. परंपरा नष्ट झालेली आणि फक्त पैशाच्या भरंवशावर शिक्षणाचें कार्य पार पाडण्याची वेळ आलेली; हें जमावें कसें? आपल्या अिथे स्थिति अशी आहे की श्रमजीवी माणूस आपल्या मुलाला शाळेंत पाठवूं शकत नाही. त्याला शिकवावें असें त्याला वाटत नाही असें नाही. परंतु तो शिकतो तोंवर मुलाला पोसावयाचें कसें? शाळेंत गेला तर तो संसाराला हातभार लावूं शकत नाही आणि तो संसाराला हातभार लावूं लागला तर त्याला आजचें शिक्षण मिळत नाही. या कोंडींतून बाहेर यायला गांधींनी विचार मांडला की "ठीक आहे. संसाराला हातभार लावण्यासाठी तो जें काम करतो त्यांतूनच

त्याला शिक्षण मिळालें पाहिजे." असें घडेल नाहीतर शिक्षणाचें काम पूर्ण होणें शक्य नाही. यांत कोंवळ्या वयांत जीवनाची जबाबदारी लादण्याचा मुद्दा नाही. मुद्दा प्राप्त परिस्थितीला शास्त्रीय स्वरूप देण्याचा आहे. पूर्वीच्या काळीं वर्णाश्रम व्यवस्था कायम होती. कुंभाराचा मुलगा कुंभाराला आपलीं मडकीं बाजारांत विकून पोट भरतां यावें म्हणून लहानपणींच चिखल तुडवीत असे. कोष्ट्याचा मुलगा सूत कातत असे. शेतकऱ्याचा मुलगा बैलांना पाणी पाजण्यापासून तों हळूहळू नांगर चालविण्यापर्यंत काम शिकत असे. क्षत्रियाचा मुलगा शत्रूचीं मुंडकीं कापलीं जावीं म्हणून लढाईवर जात असे. रामाला विश्वमित्राने बरोबर नेलें तें कोणत्या उद्देशाने? राम आपल्या आईवडिलांचा सर्वप्रिय होता, कोवळा होता, नाजुक होता, सुंदर होता. आठ नऊ वर्षांच्या त्या निष्पाप सुकुमार भावंडांना दशरथाने विश्वामित्राच्या स्वाधीन केलें आणि विश्वामित्र महर्षि त्यांना घेवून गेले, तें शिक्षणाकरतां नव्हे तर जे राक्षस ऋषींचा यज्ञ पुरा होऊं देत नसत त्यांची कत्तल करण्यासाठी, त्यांचा संहार करण्यासाठी. रामाशीं निर्दयपणे वागावें असा दशरथाचा किंवा विश्वामित्राचा उद्देश नव्हता. उद्देश येवढाच होता की जें कर्तव्य वर्णाश्रमधर्मांप्रमाणे त्यांच्या वाट्याला आलें होतें तें त्याना योग्य रीतीने कळावें. रामाच्या शिक्षणाची येवढी काळजी घेतल्यामुळेच तो अकबाणी झाला, अकवचनी झाला. सुभद्रेला प्रवासांत करमणूक म्हणून भगवान श्रीकृष्णाने चक्रव्यूहाचा भेद कसा करावा हें सांगितलें. गर्भात असलेल्या अभिमन्यूने तें अैकलें. पण अैकलेलें सिद्ध करण्यासाठी ओंठावरचें जार सुकले नसतांनाच त्याला महारथीअतिरथींशी सामना करावा लागला आणि तो करण्यासाठी अनुमति ज्याचा रथ पुण्यामुळे जमिनीच्या चार बोटें वर चालत होता त्या धर्मराजाने दिली. अभिमन्यू अैकून ज्ञान शिकला होता, अर्धेंच ज्ञान शिकला होता. म्हणून त्याला मरण आलें. या सर्व गोष्टींचें सारसर्वस्व 'वर्धा-योजनेंत' घेतलें गेलें आहे. शिक्षण अेखाद्या कलेच्या द्वारें दिलें जावें असें सर्व शिक्षणशास्त्रज्ञ कबूल करतात. पाश्चिमेकडील देशांत तसे प्रयोगहि चालले आहेत. वर्धायोजना या प्रयोगांच्या थोडी पुढे जावून म्हणते की पुस्तकी ज्ञान पुरे झालें, त्यांत अर्थ नाही. 'अर्थ' नसलेलें शिक्षण आपल्याला परवडत नाही. असंख्य जनतेला शिक्षण तर द्यावयाचें आहे. तें उद्योगांतून दिलें गेलें पाहिजे व तो उद्योग जीवनाच्या उपयोगी पडला पाहिजे. मॉंटेसरी, फ्रूबेल किंवा अन्य प्रयोगी जे म्हणतात तेंच वर्धायोजना म्हणते. पण योजना त्यांच्या नंतरची असल्यामुळे थोडें पुढे जाऊन असें प्रतिपादन करते की ज्या कलेच्या द्वारें शिक्षण द्यावयाचें ती कला खरीखुरी आणि पोटाला भाकर मिळवून देणारी असावी. या योजनेला 'जीवन-शिक्षण' म्हणतात तें याच अर्थाने. हें शिक्षण जीवनासाठी तर आहेच पण जीवनाच्याद्वारेंच आहे व हाच वर्धा-शिक्षण-योजनेने गांठलेला प्रगतीचा टप्पा आहे.

मला जाऊं दे!

सौ. उ षा ग द्रे

☆

तूं जाऊं नको म्हणतेस, पण मोहाचे हे क्षण संपविलेच पाहिजेत. माणसाची माणुसकी त्यांतच आहे. माणसाची परीक्षा त्यांतच आहे. तुला मी हवा ना ? मग या क्षणाला मला अशी भुरळ घालूं नकोस. मला मोहांत गुंतवूं नकोस, माणुसकीला पारखा करूं नकोस ! माझी प्रज्ञा, माझी सहनशक्ति, माझा मोठेपणा असा पणाला लावूं नकोस, माणसाचें मोठेपण मोहाचे क्षण टाळण्यांतच असतें. माझ्या बेदरकार वृत्तीचा तुला अभिमान वाटतो ना त्याच बेदरकारपणाने मला जाऊं दे !

पण हें काय ! तुझ्या डोळ्यांत आसवें आलीं ? तुझ्या निळ्या डोळ्यांत हें असें पाणी जमू लागलें, अश्रूंच्या गंगायमुना ओघळू लागल्या, की माझ्या जीवांचें पाणी होतें. माझ्या सात्विक प्रेमाचें हें प्रतीक तुला कसें दिसत नाही ? माझ्या कायेची तूं स्वतःला छाया समजतेस, माझ्या विजयाने तुझ्या चेहऱ्यावर चांदणें चमकतें, माझ्या दुःखाने तुला रड्डू कोसळतें, आणि तुझ्या माझ्या प्रीतीचें हें ऐक्य तुला माहीत असूनहि, तुला आपला वियोग सहन करवत नाही ! हा तुझ्या मनाचा कोतेपणा तूं झटकून नको का टाकायला ?

माझ्या जीवनाची अथांग सरिता दुथडी भरून वहात असतां तुझ्या एकटीच्या सुखासाठी तूं तिला बंधन घालणार ! हाच का तुझ्या मनाचा मोठेपणा ? वेडे, ही सरिता अशीच दुथडी भरून वाहूं दे. पृथ्वीचा अथांग भूभाग भिजून निघूं दे. दोन्ही थडीवरील शेतें, माझ्या जीवनसरितेच्या पाण्यानें हिरवीगार दिसूं देत. त्यावर मोत्याचीं कणसें चमकूं देत. असंख्य जीवांची क्षुधा त्यामुळे भागूं दे ! दमून गेलेल्या असंख्य प्रवाशांना माझ्या जीवनसरितेच्या पाण्याने ताजेपणा येऊं दे. तुझ्या स्वार्थासाठी तूं माझ्या जीवनसरितेला अडवूं नकोस. माझ्या जीवनसरितेचा प्रवाह अडवून, त्यात नौकाविहार करण्याची तुझी इच्छा तुला स्वार्थी वाटत नाही का ! तुझें मन मोठें कर. मोहाचे क्षण जिंकून टाक. असंख्य जीवांच्या कल्याणासाठी, माझी जीवनसरिता वाहूं दे, मला जाऊं दे !

माझ्या विजयाने तुझ्या चेहऱ्यावर चांदणें चमकतें ना ! मग माझा विजय, माझा पराक्रम, तूं असा खुंटविणार का ? तुझ्या एकटीच्या स्वार्थासाठी

अनुक्रमणिका

त्याला मर्यादित करणार कां? नको, असा वेडेपणा करू नकोस! माझ्या पराक्रमाने, माझ्या विजयाने असंख्य जीव सुखावूं देत व त्यांचें सुख पाहून तुझ्या माझ्या-वरील प्रेमाला भरती येऊं दे! माझ्या जीवनसरितेच्या प्रेमळ स्पर्शाने आनंदित झालेल्या, बहरलेल्या, हिरव्यागार शेतांत, तूं विश्रांति घे. माझ्या ऐश्वर्यानं आनंदित झालेल्या, माझ्या विजयानं नटलेल्या, त्या गोड- स्थळीं बसून, तुझें माझ्यावरचें प्रेम बहरूं दे. तुझ्या त्या आवडत्या "वसंत बहाराचे" गोड मंजुळ स्वर तूं पुन्हा पुन्हा आळव. माझ्या जीवनसरितेच्या ओघ तुझ्या गाण्याला त्याचवेळी साथ देईल आणि त्या गोड संगीताने सारी सृष्टि फुलून जाईल. म्हणून म्हणतो, मोहाचा हा क्षण जिंकून मला जाऊं दे!

हा मोहाचा क्षण म्हणजे एक स्वप्न आहे! स्वप्नें कितीहि गोड असलीं तरी तीं चिरकालीं नसतात. बोलून चालून स्वप्नें तीं! त्या क्षणभंगुर स्वप्नाच्या नादीं लागून, तूं आपलें चिरकालीन सुख का गमावून बसणार आहेस! सुखाची तुझी कल्पना किती कोती आहे ही! सुख स्वतःला मिळविण्यांत मोठेपणा नाही, तें लोकांना मिळवून दिल्यावर, त्यापासून मिळणाऱ्या सुखाचा तूं अनुभव घे. तें सुख विशाल असतें! तें सुख तूं मिळव. माझ्या पराक्रमांत तूं धोंड होवूं नकोस. त्या पराक्रमाने सुखावणाऱ्या असंख्य जीवाकडे पाहून, तुझें माझ्यावरील प्रेम द्विगुणित होऊं दे. माझ्या पराक्रमाचें क्षेत्र अडवूं नकोस.

तुला हवंय तरी काय? माझा सहवास हवा? तुझ्या माझ्यावरील आत्यंतिक प्रेमामुळे आपण दोन्ने एकच आहोंत ना! माझ्या कायेची तूं छाया. मला काटा बोचला की, तुझ्या डोळ्यांत आसवें येतात. माझ्या विजयाने तुझ्या गालीं गुलाब फुलतात. हें सारें तुझ्या माझ्या प्रीतीचें ऐक्य तुला माहीत असताहि, जड देहाच्या सहवासासाठी का तूं तळमळते आहेस? तुझ्या दृष्टीचा हा कोतेपणा तूं केव्हां घालवावयास शिकणार? स्वप्नाच्या धुंदींत तूं भविष्याच्या पडद्यावर संसाराचीं मनोरम चित्रें रंगविलींस, पण संसाराचा किती कोता अर्थ तुझ्या डोळ्यापुढे, त्या स्वप्नांच्या धुंदींत होता! ऊठ! जागी हो! जीवनांत स्वप्नाला किंमत नसते. जागृतावस्थेंत खऱ्या अर्थाने आपण आपल्या देशाचा संसार, पुन्हां एकदा उज्वल करूं. या घरांच्या भींतींपलीकडे कांहीतरी विशाल, उज्वल आहे, याची जाणीव ठेव आणि या घराच्या भींतींपलीकडे माझ्या पराक्रमाला वाव मिळण्यासाठी, मला जाऊं दे!

तूं म्हणतेस, ज्याचें सुख दुसऱ्यावर अवलंबून असतें, त्यांच्या कपाळीं सदाच दुःख, सदाची निराशा ठेवली असते. ज्याच्यावर आपलें सुख अवलंबून असतें त्याच्याकडे अगदी संकुचित दृष्टीने पाहिलें म्हणजे असें दुःखच वाट्याला येणार! हा निराशेचा सूर टाकून दे! ज्याच्या पायीं तूं आपली सारी प्रीति, सारी भक्ति वाहिली आहेस त्या तुझ्या देवाचें देवपण टिकविण्यासाठी त्याला मोहांत गुंतवूं नकोस. तूं प्रेमाने लावलेली प्रेमवेली फाजील प्रेमाने खुरडून टाकूं नकोस. तिला

जलधारांचें स्नान होवूं दे. व्यवहाराच्या उन्हाचे चटके बसू दे ! म्हणजेच ती नवतेजाने बहरेल, आणि फुलेल. मी कुठेहि गेलों, तरी मी मनाचें पवित्र बंधन पाळावें, असें तुला वाटतं ना ! मग तूंच मला मोहांत कां लोटते आहेस? तुझ्यापासून दूर गेल्यावरहि जर तूं मनाने, माझ्या कायेची छाया होवून माझ्या अवतीं भोवतीं वावरणार असलीस तर, तुझ्या प्रेमळ भक्तीने, माझ्या जीवन-पुष्पाची एक एक कळी नवतेजाने खुलेल, आणि त्या तेजाने तुझें जीवन आणखी सुखावेल. म्हणून म्हणतों मला हंसत निरोप दे ! मला जाऊं दे !

चल, ऊठ लौकर. तूं म्हणतेस तद्वत दिन-रजनीची सरणी हातांत घेतलेला काळ एक एक मणी ओढीत जवळ येत आहे. तुझें नी माझें हें सुन्दर तारुण्य तो नष्ट करील. तुझ्या माझ्या आकर्षणाचा पुष्कळसा भाग कमी होईल. आत्यंतिक सहवासाने तुझे दोष मला दिसूं लागतील, व माझे तुला कळून येतील. स्वप्नाच्या धुंदित बुद्धिपुरस्सर डोळेझाक केलेले आपले एकमेकाचें दोष काळ आपल्याला भेडसावून दाखवील. जास्त वेळ थांबल्याने माझ्या कर्तव्याचें मला विस्मरण पडेल, माझ्यामधे जडत्व संचारेल. माझ्या शरीरावरचा माझा ताबा कमी होईल. माझी जीवनसरिता सुकून जाईल. दुथडी भरुन वाहून जात असतानाच माझ्या सरितेपासून असंख्य जीवांना सौख्य लाभूं दे. तुझ्या स्वतःच्या सुखाचा त्यासाठी त्याग कर ! त्यागानेच तुझें माझ्यावरचें प्रेम तावून सुलाखून, त्याला नवा उजळा मिळेल तुझ्याप्रमाणेच पुष्कळ जीवांना मी हवा आहें. त्या साऱ्यांच्या सुखाला आग लावून त्यावर उभारलेलें सुख कां तुला मिळवावयाचें आहे? साऱ्यांना सुखव. संकुचित दृष्टि टाकून मन विशाल कर, आणि साऱ्यांच्या सुखासाठी हंसत मला निरोप दे. मला जाऊं दे !

——

★

मुक्तछंद

अभंग

माझा मुक्तिसाठी जीव हा भुकेला
परी बंधनांत तूंच बांधलेला !
माझ्या जीवनांत मुक्ति प्रलोभन
बांधलेल्या तुझें उन्मुक्त जीवन !
माझ्या मीपणाची जिये फिटे भ्रांती
आणि सर्वांठायीं दिसे माझि कांतीं !
मुक्त जिवनाचा अतीव आनंद
स्वयं बंधनाचा होय मुक्त छंद !

—निशिकांत कालगांवकर

तुरुंगाचा प्रसाद

वसंत लुले,

☆

स्थूलमानाने साहित्याचे दोन विभाग पाडले जातात, रिझविणारें साहित्य आणि शिकविणारें साहित्य. रिझविणारें साहित्य हें बहुधा करमणुकीखातरच लिहिण्यांत येतें. शिकविणारें साहित्य मात्र कांही एका विशिष्ट हेतूने प्रेरित होऊन लिहिलें जातें. अर्थात अशाप्रकारच्या वाङ्मयनिर्मितीस प्रतिभेबरोबरच सखोल अभ्यास, मनन आणि चिंतन यांचीहि जोड लागते. म्हणून हा वाङ्मयविभाग हाताळण्याच्या भानगडींत सामान्य दर्जाचा माणूस सहजासहजी धजत नाही. साहजिकच हें वाङ्मय मौलिक स्वरुपाचें असतें. असल्या तऱ्हेच्या साहित्याची निर्मिति करणाऱ्या लेखकांच्या दृष्टीने वाङ्मय हें एक प्रसाराचें नी प्रचारांचें माध्यम ठरतें. हा लेखक वर्ग कांही एका विशिष्ट ध्येयाने, हेतूने वा तत्वाने प्रेरित झालेला असतो. ह्या लोकांना प्रभावी शक्तीशी मुकाबला करावा लागतो नी आपले विचार मोठ्या जोराने, जोमानें पुढे मांडावे लागतात. कित्येक त्यामुळे चिरडले जातात, तर हजारों कारागृहांच्या चार भिंताडाआड कोंबले जातात. परंतु चार भिंताडांच्या आड जरी त्यांना डांबून टाकलें असलें, दरवाज्याच्या लोखंडी गजांनी जरी त्यांना रोखून धरलें असलें, तरी त्यांचीं स्वैर मनें कुठल्याकुठे उड्डाण करीत असतात. त्यांचीं शरीरें जरी बंदीखान्यांत असलीं तरी मनें मात्र सतत स्वतंत्रच राहातात. असें नसतें तर आज आपल्याला जें तुरुंगांत लिहिलें गेलेलें अमोल वाङ्मय वाचायाला मिळतें त्याला आपण मुकलों असतों. आपल्या देशांतील, किंबहुना साऱ्या जगतांतील राजकीय घटनांवर आपण दृष्टिक्षेप टाकला तर आपल्याला काय आढळून येतें ? हजारों माणसें तुरुंगांत डांबलीं जात आहेत. परंतु हे लोक स्वस्थ बसणें अशक्य आहे. बाहेर जो निवांतपणा त्यांना मिळत नाही तो त्यांना तुरुंगांत मिळूं शकतो आणि साहजिकच त्यांच्या हातून वाङ्मयनिर्मितीस सुरवात होते. अन्यायाची चीड नी प्रतिकार याचा तें वाङ्मय म्हणजे आविष्कार होय. जुलमी राजवट आणि घातकी सामाजिक . चालीरीती यांचें उच्चाटण करण्यासाठीच असलें हें प्रखर साहित्य निर्माण झालेलें असतें. रक्ताने लिहिणारे लेखक नी शाईने लिहिणारे लेखक यांतला फरक हाच.

तुरुंगांतील वाङ्मयनिर्मिती ही कांही आजची गोष्ट नाही. आपल्या देशाचा विचार जरा बाजूला सारला आणि इंग्रजी वाङ्मयावर जर आपण एक

अगदी ओझरता दृष्टिक्षेप केला तर आपल्याला असें आढळून येईल की ख्राइस्टच्या पूर्वीपासून तुरुंगांतील वाङ्मयनिर्मिती चालू आहे. खरोखरी तुरुंगाने जागतिक साहित्याला चांगलाच हातभार लावला म्हणायाचा ! मोटमोठालीं महाकाव्यें, ग्रंथराज, आत्मचरित्रें, आणि इतिहास यांची निर्मिती तुरुंगांतच झाली.

तुरुंगांत वाङ्मय निर्माण करणाऱ्या लेखकांत सर्वांत जुना नेव्हीस हा होय. इ. स. पूर्वी तो होऊन गेला. तेव्हांच्या धनिक वर्गावर त्याने चांगलेच ताशेरे झाडले आणि त्यांचा राग आपल्यावर ओढवून घेतला. बिचाऱ्याला त्यामुळे कारावास भोगावा लागला. तिथे असतांना त्याने दोन नाटकें लिहिलीं. पण दुर्दैवाने तीं आज उपलब्ध नाहीत.

टयासो ह्या इटालियन कवीने आणि तत्ववेत्त्याने आपलें महान काव्य व तत्त्वज्ञानावरील ग्रंथ तुरुंगांत असतांनाच लिहिला. कयांपानेला हा इटालियन तत्ववेत्ता वीस वर्षे तुरुंगांत होता आणि तिथे त्याने 'सानेट्स्' लिहिलीं. सिमंड्स् ह्या इंग्रज लेखकाने त्यांचें भाषांतर सन १८७८ मध्यें केलें. सर्व्हेन्टिसचें 'डॉन् क्विक्झोट' हें पुस्तक कारागृहांतच लिहिलें गेलें. व्होल्टेरने 'ओडेपि' आणि 'हेन्रियड्' च्या सुरुवातीचा कांही भाग तुरुंगांतच लिहला. थॉमस पेन्ने आपले 'द् एज् ऑफ रीझन्' कारागृहाच्या भिंताडांतच संपविलें. ओ हेन्री ह्या सुप्रसिद्ध लघुकथा लेखकाच्या पहिल्या कांही कथा तो तीन वर्षे तुरुंगांत असतांनाच लिहिण्यांत आल्या. 'ॲन् आफ्टरनून् मिरॅकल्' व 'क्रिस्मस् गिफ्ट' ह्या कथा उदाहरण म्हणून सांगता येतील. हिटलरने 'माय स्ट्रगल्' तुरुंगांतच लिहलें. अर्न्स्ट टोलर आणि स्टिफन झ्वाइग यांचें बरेचसें वाङ्मय बंदीखान्यांतच लिहण्यांत आलें.

इग्लंडइतकी तुरुंगांतील वाङ्मयनिर्मिती साऱ्या जगांत दुसरीकडे कुठेच झाली नाही. बनियन्सचें 'पिलग्रिम्स् प्रोग्रेस' हें जगप्रसिद्ध पुस्तक आणि वाइल्डचें 'डि प्रोफंडिस' हा ग्रंथ तुरुंगाचाच प्रसाद आहे. आणखी कितीतरी ही यादी लांबवितां येईल.

आपल्या देशांतली कारागृहांतील वाङ्मयनिर्मिती कांही कमी नाही. टिळकांचें 'गीतारहस्य' ही तुरुंगाची अमोल देणगीच म्हटली पाहिजे. सावरकरांचें 'कमला' हें खंडकाव्य आणि इतर बरेंचसें वाङ्मय अंदमानांतच लिहिलें गेलें. टिळकानंतर देशांत गांधीवादाचा प्रसार फार झपाट्याने सुरू झाला. चळवळी, सत्याग्रह, लाटीमार आणि तुरुंगवास यांना नुसता ऊत आला होता. बेचाळीसच्या आंदोलनापूर्वी आणि नंतर हजारो देशभक्त तुरुंगांत डांबून टाकले होते. परंतु ते स्वस्थ राहणें कसें शक्य होतें ? हजारो प्रश्न, नाना विचार नी समस्या त्यांच्या पुढे उभ्या होत्या. वाचन, मनन व चिंतन हा त्यांचा कारागृहांतील नित्याचा कार्यक्रम. साहजिकच लेखनाकडे या लोकांचा कल

झुकला. आजच्या आपल्या पुढाऱ्यांकडे पाहिलें तर आपल्याला असें दिसून येतें की जीवनाची कितीतरी वर्षे ह्या नेत्यांनी कारावासांत काढलीं. पण तिथेंहि ते स्वस्थ बसले नाहीत. महात्मा गांधींचा आदर्श त्यांच्यापुढे होता. गांधीजींचें बरेसचें वाङ्मय तुरुंगांत लिहिलें गेलें. पंडित नेहरूंची ' आटोबायोग्राफि ' ' ग्लिम्प्सेस् ऑव् वर्ल्ड् हिस्टरी ' आणि अगदी अलिकडचें ' द् डिस्कव्हरी ऑव् इन्डिया ' हीं पुस्तकें म्हणजे तुरुंगाने दिलेलीं बहुमोल रत्नेंच होत. राजेंद्रबाबूंचा ' इन्डिया डिव्हायडेड् ' हा पाकिस्थानवरील उत्कृष्ट टीकाग्रंथ तुरुंगांतच लिहिला गेला. मौलाना आझाद साहेबांचें आत्मचरित्र, आणि कुराणावरील भाष्यहि तुरुंगांतलेंच. पट्टाभिसितारामय्यांचें ' फेदर्स् ॲन्ड् स्टोन्स् ' तुरुंगाचीच देणगी. डांग्यांचें ' फ्रॉम् प्रिमिटिव्ह कम्युनिझम् टू स्लेव्हरि ' हा उत्कृष्ट ग्रंथ, शंकरराव देवांचें ' भगवान बुद्धासाठीं ' हें पुस्तक, पंडित मिश्राजींचें ' कृष्णायन ', ' कम्युनल् ट्रँगल इन् इंडिया ' हा अशोक मेहता, अच्युत पटवर्धन, नी युसुफ मेहरअल्ली ह्या तिघांनी मिळून लिहिलेला ग्रंथ, पंडित सुंदरलालजींचें एके काळी फार गाजलेलें ' भारत में अंग्रजी राज ' हें प्रक्षोभक पुस्तक, हें सारें तुरुंगांतलेंच !

ह्या राजकीय वाङ्मयावरून दृष्टि बाजूला सारून आपण जर ती सध्याच्या ललितवाङ्मयाकडे वळविली तर तुरुंगांत वाङ्मयनिर्मिती करणाऱ्या लेखकांची एक भली मोठी रांगच आपल्यापुढे उभी राहाते. गांधीवादाची जी एक प्रचंड लाट सध्या आपल्या देशांत पसरली आहे तिचेच हे बहुधा उपासक. आपलें कार्य उत्कृष्ट रीतीने ते पार पाडीत आहेत. मराठी पुरतेंच बोलायचें झाल्यास साने गुरूजींना ह्या लेखकवर्गात अग्रेसरत्वाचा मान दिला पाहिजे. बरेंचसें आयुष्य त्यांनी कारागृहांतच काढलें. वाचन, मनन आणि लिखाण हाच तिथे त्यांचा उद्योग. लिहायचें नी आपल्या इतर सोबत्यांना तें वाचून दाखवायचें हा त्यांचा कार्यक्रम. कितीतरी उत्कृष्ट पुस्तकें त्यांनी तुरुंगांतच लिहिलीत. आबालवृद्धांना वेड लावणारी नी हलवून सोडणारी ' श्यामची आई ', ' कला म्हणजे काय ' हा उत्कृष्ट ग्रंथ, ' चिंतनिका ' नी इतर बरेच ग्रंथ त्यांनी बंदीखान्यांतच संपविले. साने गुरूजी-नंतर, आचार्य दादा धर्माधिकारी, विनोबा भावे, वामनराव चोरघडे आणि जावडेकर यांचीं नांवे आपल्याला घ्यावीं लागतील. सोशालिस्ट पुढारी ना. ग. गोरे यांचें ' कारागृहाच्या भिंती ' हें सुंदर पुस्तक त्यांनी तुरुंगांतच लिहलें.

तुरुंगांत लेखन करणाऱ्या वाङ्मयसेवकांची परंपरा अजूनहि चालू आहे आणि ती अशीच अखंड चालू राहणार. तुरुंगांत गेल्यामुळे ह्या वंदनीय व्यक्तींना भयंकर हालअपेष्टा सहन कराव्या लागतात ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु त्या बरोबरच जागतिक वाङ्मयांत फार मौलिक अशी जी भर तुरुंगामुळे पडली आहे आणि पुढे पडेल, ती नजरेआड करून भागणार नाही. तुरुंगाच्या ह्या प्रसादाची गोडी अवीट आणि कांही वेगळीच आहे !

ताजाचें हृद्गत !

★

(१)

लखलखणारा ताजमहाल
हें दिव्य, भव्य स्मारक जगतीं
मुमताजच्या हें प्रेमाचें की,
मजुर गड्यांच्या प्रेतांचें ?
हें स्मारक तरि मग कोणाचें ?
मुमताजचें की, मजुरांचें ?
हे पायाचे खड्डे सारे
मज दिसती मजुरांनी भरले
नि त्यांच्यावर हा डोलारा
मुमताज प्रीतीचा फुलोरा !
हाडांच्या विटा करूनिया
रक्त, अश्रु आणि घामानें–
मांसाचा चुना कालवुनी
ही कबर बांधली मजुरांची !
परि देखावा वरी प्रेमाचा
धनिकांच्या जगतामध्ये हा !
ऐसेंच आज अन् उद्या तरी
इतिहास गोडवे गाईल ते
हा ताजमहाल, हा ताजमहाल !

(२)

कोटि रुपयांचा चुरा चुरा
अधिकार, जुलुम, अत्याचारें
जी लूट केली निर्दयतेनें
त्या हरामी पैशावरती हा
लखलखे ताज मूर्तिमंत !
भोळ्या जनतेच्या पोटावर
देऊनी पाय निर्दयतेने
तोंडातील घांस हिरावूनी
बांधला ताज हैसेखातर,
प्रेमाखातर, प्रियेखातर !
कोटि जनता विव्हळत असे
अन्नावस्त्रावाचुनि उघडी
नि ताज मोकळा पडलेला
वास्तव्य भुतांचें, पालींचें !
ही मानवतेची खांडोळीं
टांगलीं निर्दयें वाळवीत
त्याचेंच प्रतिक मूर्तिमंत
हा ताजमहाल हा ताजमहाल !

(३)

गरिबांचा जातो जीव जिथे
धनिकांचा होतो खेळ तिथे
हें सूत्र जगाचें कटु-सत्य
आलें चालत जाईल पुढती
नि आजहि आम्ही तें बघतों
लाखो मजूर पिचुनि चुरा
मंदिर उभारती त्यावरती
धनिकांच्या हौसे खातर हें !
जोवरी न ठोकरा बसती तया
नव तत्व, ध्येय, नव जगताच्या !
—ऐका ताजाचे आर्तस्वर
अंतर्मन जागें करूनिया !
ऐका मजुरांचीं शोकगीतें–
चित्कार, कण्हणें, सुस्कारे !
परि ऐकूं जगा ये प्रीतिगीतें
दुर्भाग्य हें ! दुर्भाग्य हें !

—ल. वा. पडोळे

२५.४.

अनुक्रमणिका

माझी मित्रमंडळी—

जवळून दिसणारे शांताराम

ना. रा. शेंडे, नागपूर.

★

भाणाक्षपणा हा एक सद्गुण समजला जातो. जे लोक साधा सरळ व्यवहार करतात ते बहुधा प्रगतीच्या मार्गावर रेंगाळत राहतात आणि जे जीवनाच्या धकामकींत डोकें खुपसून धूर्तपणाने पुढे पाऊल टाकतात ते मागाहून येऊनहि भराभर पुढे सरकतात. धिम्या आणि शांत प्रवृत्तीचे लोक ह्या दुसऱ्या प्रकारच्या लोकांना नावें ठेवतात. ह्या दुसऱ्या प्रकारच्या लोकांत माझे एक स्नेही मोडतात. त्यांचें नांव शांताराम.

शांतारामांची आणि माझी प्रथम भेट नागपूरच्या राजाराम वाचनालयांतच झाली. शांताराम त्यावेळी विद्यार्थी होते नी मी 'साहित्य चर्चामंडळा'चा चिटणीस होतों. मंडळातर्फे होणाऱ्या वादविवादांत त्यांनाहि स्थान मिळावें म्हणून ते मला भेटायला आले होते. धिटाईने बोलण्याची त्यांची शैली, दुर्दम्य उत्साह अन् तरतरीतपणा ह्या गोष्टी चटकन् माझ्या नजरेंत भरल्या. त्यांची एक लघुकथा—मला वाटतें 'गुलाम' नांव होते तिचे—श्री. संत नांवाच्या एका मित्राने आमच्या मासिकासाठी नुकतीच मला दिली होती आणि लगेच शांतारामांनी घेतलेली ही भेट! माझ्याकडून अर्थात् त्यांना मित्रत्वाचें आवाहन मिळालें आणि ते मोकळेपणी हंसत घरी गेले.

शांताराम देखणे आहेत. "स्वामी विवेकानंदाच्या चेहेरपट्टीसारखा आहे शांतारामचा तोंडवळा" असें प्रा. या. मु. पाटकांनी म्हटल्याचें मला स्मरतें. पोषाखांत कमालीची टापटीप, बांधेसूद शरीर, मावळत्या सूर्यकिरणांच्या झाके-सारखा रंग, किंचित् फुगीर नासिकापुटें, टपोऱ्या द्राक्षासारखे नेत्र, माळरानांतून सरळ गेलेल्या वाटेप्रमाणे काढलेला मधोमध भांग, गुबगुबीत गाल, गालावर पडणारी मोहक खळी, जणुं तक्षशीलेंतून आलेली आणि एकदा असें झालें—पद्मशी हॉटेलांतून चहा घेऊन मी बाहेर पडणार तों कंगन स्टोअरजवळ बुशकोट वजा जाकीट घालून उभ्या असलेल्या तरुणीला 'अहो शांताराम' म्हणून मी हाक दिली. केवढी फसगत झाली होती माझी!

विद्यार्थीदशेंत असतांना आघाडीवर येण्याची ते जी धडपड करीत त्यावरून त्यांचेसंबंधी मी जो कयास बांधला होता तो आता खरा ठरला! सध्या

ते प्राध्यापक आहेत. सभा सम्मेलनांतून त्यांचें अस्खलित वक्तृत्व श्रोतृवर्गावर छाप पडणारें असतें. त्याबरोबर त्यांची कुशल लेखणी वाचकांची मनें आकर्षून घेते. गेल्या नऊ दहा वर्षांत त्यांनी थाटलेला आपला साहित्य-संसार पाहाण्यासारखा आहे. १९४० च्या त्या वेळच्या "सह्याद्रि" मासिकाने त्यांचा पहिला उत्कृष्ट लेख छापून त्यांचा गौरव केला. आतापर्यंत त्यांच्या लघुकथांचे दोन संग्रह--एक "संन्याचा बाग" व दुसरा—'मनमोर'.--प्रसिद्ध झाले असून तिसरा संग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहे. याशिवाय कै. कविवर्य भा. रा. तांबे यांच्या काव्यावरील विवेचनात्मक लेख, हिंदी काव्यावरील लेख, "दिसामाजी कांहीतरी" अशीं वैचारिक सदरें, अनेक बोधप्रद लघुनिबंध आणि लघुकथा इ० त्यांची वाङ्मयसंपदा उल्लेखनीय आहे. त्यांच्या संग्रहाचें समीक्षण करण्याचा प्रसंगहि मजवर येऊन गेला असल्याने येथे विस्तार नको.

शांतारामांच्या बोलण्यांत, लिहिण्यांत एकप्रकारची खुमखुमी असते. वाद घालतांना दुसऱ्याला कसें गारद करतां येईल ह्याची मोठ्या कौशल्याने ते क्लृप्ति योजतात. कुणी आपला आवाज चढविला तर ते दुपटीने आवाज चढवून, मग आपलें कथन सत्य असो या नसो, प्रतिपक्षाला दाबून टाकण्याचा जिद्दीने प्रयत्न करतात. आपल्या दणकट आवाजांत ते म्हणतात, "अरे बाबा असें नव्हे तें. जें आहे तें असें आहे बघ. उगीच काय बडबड ही." आणि मग डॉ. जॉनसन, स्टिव्हनसन, बायरन, टॉलस्टाय, बर्नार्ड शा, शेली, हक्स्ले, एवंच जो सुचेल तो महाभाग तोंडावर फेकून विरोधकाचा त्रिफळा ते साफ उडवून देतात.

स्नेहसंवर्धक मंडळांत शांतारामांचा सुरवातीपासूनच प्रवेश होता. ह्या मंडळाच्या बैठकी मनोरंजक असायच्या. पण कधीकधीं तेथे वादांतून वितंडवाद व नंतर वितंडवादाचें रुपांतर हमरीतुमरीत होऊन शेवटीं गुद्दागुद्दीची पाळी येण्याचा सुमार होत असे. एकदा मंडळाचे सदस्य सिताबर्डी चौकांतील डॉ. खऱ्यांच्या डिस्पेन्सरी पुढील पायरीवर बसून वाद घालत बसले आणि ही वादाची वितंडा सुरू झाली. वादाचें प्रयोजक होते लघुकथाकार शांताराम आणि विरोधक होते आमचे टीकाकार राजाभाऊ! साहित्याचें मूल्यमापन करणाऱ्या ह्या दोघांहि साहित्यवीरांची त्यावेळची शब्दझुंज जर एखाद्या तिऱ्हाइतानें ऐकली असती तर तो उद्गारला असता—"नकोरे बाबा वाद आणि नको असले नागपुरी चंद्रपुरी वाक्प्रचार."

वादाचे असे प्रसंग अनेकदा येऊन गेलेत. प्रत्येक वेळेला शांतारामांचा रुद्रावतार त्यांच्या चंद्रपुरी वाक्प्रचारांत प्रगट होतो की काय ह्याची धास्ती वाटायची. मी म्हणायचा, "जाऊं द्या हो शांताराम, कशाला उकरता असला वाद! त्यांतून तुमच्या सारख्या प्रगतिशील लेखकानं मोठेपणाच दाखवायला हवा. वादांतून निष्पन्न तर कांही होत नाही पण द्वेष मात्र बळावतो." यावर ते अगदी शांतपणे म्हणायचे, "अहो, असं म्हणून कसं चालेल? रामदास सांगून गेले 'खटनटाशीं खटनट' त्याशिवाय दुसरे लोक येत नाहीत ताळ्यावर."

अनुक्रमणिका

पण, शांतारामांचें मला मोठें कौतुक वाटतें. कितीहि वितंडवाद झाला आणि प्रकरण कोणत्याहि थरावर गेलें तरी दुसरे दिवशी ते विरोधकाच्या गळ्यांत गळा घालून त्याला चुचकारतात. ह्या वागण्यांत किती मोठे मन अन् दिलदार वृत्ति आहे!

शांताराम हे एक व्यवहारचतुर तरुण आहेत. त्यांच्या प्रापंचिक जीवनाची रीत हेवा वाटण्यासारखीच आहे. कमावलेल्या पैशांतून महिन्याकाठी ठराविक बचत करून उरलेल्या रकमेंत टापटिपीचा संसार कसा करावा हें ते चांगले जाणतात. बाहेरच्या जगांत त्यांचे व्यवहार रंग पाहूनच असतात. त्यांची व्यावहारिक चलाखी काहीना फाजील वाटते. एकदा शांताराम कांही मित्रांना घेऊन उपहार गृहांत शिरले. तेव्हा एकाने शांतारामांना हटकलें, "काय रे, तुझी वतावणी मोठी विचित्र दिसते! इतका पैसा कमावतोस तर तो जातो रे कुठं?" यावर शांताराम चटकन् म्हणाले, "अरे तुम्हा लोकांना वरवर दिसते की मी खूप पैसा कमावतो म्हणून! पण माझा घरचा खर्च कसा दिसेल तुम्हाला? आणि पैसा खर्च करण्याची तऱ्हा तुम्ही मला शिकवू नका. खिशांत पैसा असला तर मी अवश्य खर्च करतो आणि मित्र म्हटला तर प्रसंगी कोणाचा किती पैसा खर्च होतो, तो योग्य वा अयोग्य असं मी मुद्दाम पाहात नाही. कारण हा ज्याच्या त्याच्या ऐपतीचा प्रश्न आहे." शांतारामांचें हें म्हणणें पटण्यासारखें आहे. गृहस्थी माणसानें आपले व्यवहार सांभाळूनच करावेत नाही कां? एखाद्याने आपल्या घराकडे दुर्लक्ष करण्यांत आणि अनाठायी पैसा खर्च करून एकमेकांवर ताशेरे झाडण्यांत काय लभ्यांश?

खरोखरी शांतारामांचे दोन पैलु लक्षांत घेण्यासारखे आहेत. पेशा नीट सांभाळून त्यांतून वर कसें चढतां येईल हा एक आणि लेखकवर्गांत वाङ्मयीन दर्जा कसा दाखविता येईल हा दुसरा. ते मोठ्या शिताफीने निर्माण करूं पाहात असलेली वाङ्मयीन आघाडी पाहून कांही त्यांना चालाख समजतात. 'पानी तेरा रंग कैसा जिसमें मिलावे वैसा' असा शांतारामांचा इतर श्रेष्ठ साहित्यिकांशी संबंध असल्याचा खमंग वास आल्याने कांहींचा तसा समज होत असावा. कांही त्यांचेवर कटबाजीचा आरोप करतात. पण ते कोणाच्या टोपारोपांची मुळीच पर्वा न करता आपलें आसन घट्ट करण्याची जागरूकता बाळगतात. माझ्या दृष्टीने शांतारामावर एकप्रकारचा अन्यायच झाला आहे. कारण त्यांनी लेखनकार्याला जेव्हा सुरुवात केली तेव्हा पुण्या-मुंबईच्या साहित्यिकांनी त्यांना बरेंच उचलून धरलें खरें पण नंतर त्यांच्या लिखाणाची योग्य ती कदर व्हावी तशी झाली नाही. निदान लघुकथाकारांत तरी प्रगतीच्या मार्गावर चढण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला आहे आणि आता ते पायरी पायरी ओलांडून प्रथमश्रेणीच्या लघुकथाकारांच्या प्रांगणाकडे जात असल्याचें दिसतें. अर्थात् यासाठी त्यांना थोडी तपस्या करावी लागणार हें उघड आहे. आणि माझी खात्री आहे की अल्पावधींतच ते मानाची जागा खास पटकावतील!

शांतारामांनी लघुनिबंधांतहि बरीच प्रगति केली आहे. लघुनिबंध लिहिण्याची त्यांची धाटणी आकर्षक आहे. सुदैवाने ते प्राध्यापक असल्यामुळे त्यांचे वाचन चांगलें आहे. परंतु पट्टीचा लेखक होण्यास जो गाढ व्यासंग हवा तितका नसल्याचा माझा समज आहे. ललित वाङ्मयासाठी स्वतःला पुरेल इतकें वाचन मात्र तें न चुकतां करीत असतात. त्यांच्या वादविवादाच्या बोलण्यावरूनहि हें ओळखतां येतें. तथापि केव्हा केव्हा नसेल ती माहिती पुरवून दुसऱ्यांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याची चालाखी वादवितंडेंत ते करून जातात, उद्देश आपली जीद्द पुरी करून फड जिंकण्याचाच अर्थात् !

'आजचें प्रगतिशील काव्य' ह्या विषयावर परवा आमच्यांत मोटा वाद निघाला. शांतारामांनी कवि अनिलांच्या काव्याचें विशेष सांगून, अनिलांनी महाराष्ट्राला काव्याची नवीन दिशा दाखविली, वास्तविक जगाची ओळख करून दिली आणि पुरोगामित्व काय तें शिकविलें असें मत प्रतिपादन केलें. दुसऱ्या एकाने मर्ढेकरांची बाजू उचलून धरली. आणि तिसऱ्या एकाने शरच्चंद मुक्तिबोधांच्या वास्तवतापूर्ण काव्याचे पैलु सांगितले. ह्या खडाजंगीच्या वादांत अनेक कवींचा उद्धार झाला असला तरी कवि अनिल आणि मुक्तिबोध यांच्या प्रगतिशील काव्याबद्दल मात्र एकमत झालें. पण वादांतील एकमेकांचे थोडे भिन्न विचार पाहून एकजण शांतारामांना म्हणाला, "काव्याचं तुझं वाचन पाहून मला तुझी कींव येते. उगीच थापा काय मारतोस!" आणि मग शांताराम जे घसरले तें कांही विचारूच नका. चहाचे दोनचार पेले रिकामे केल्यावर हे वादपटु लघुकथाकारांच्या आखाड्यांत उतरले. टीकाकार मित्र म्हणाले, "सध्यातरी पु. भा. भावे, गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले हे आघाडीवर आहेत." शांताराम म्हणाले, "भाव्यांच्याबद्दल सध्या बोलत नाही मी. पण..." ते बोलत असतांनाच तिसऱ्याने मध्ये तोंड घातलें. तो म्हणाला, "रा. भि. जोशी, अरविंद गोखलें आणि कांहि अंशीं गंगाधर गाडगीळ यांची सद्दी अल्पकाळांतच संपुष्टांत आली आहे. अलीकडील त्यांच्या कथा बाजारभावाप्रमाणं उतरत आहेत. तेव्हा"— चौथा एक प्रादेशिक अभिमान बाळगणारा चिकित्सक म्हणाला, "भाव्यांच्या दर्जाबद्दल प्रश्नच नाही. गो. रा. दोडके प्रसिद्धि पराङ्मुख असल्याने ते जरी कोणाच्या नजॆरेत एकदम भरत नसले तरी त्यांचाहि वाङ्मयीन दर्जा कमी नाही. शांतारामांची प्रगति तर वाढतच आहे. परंतु गोष्ट अशी आहे ना की बरीचशी मासिकं अन् साहित्यिक आहेत पुण्या-मुंबईला. तिकडे कंपूबाजी होत असल्याचा बोलबाला ऐकूं येतो. तेव्हा महाविदर्भांतील लेखकांचा उदोउदो कसा होईल ? आणि असं सर्वत्रच चालतं. तेव्हा कोणाला दोष तरी कां देत बसावं!" शांताराम उद्गारले, "खरं आहे हें!" आणि हा वाद येथेच संपला, हें नशीब!

शांताराम तसे मोटे रसिक आणि रंगेल आहेत. स्वभाव अगदी दिलखुलास. एकदा मी कांही कामानिमित्त त्यांच्याकडे गेलों. तों शांताराम लंगोट कसून आंगाला तेल चोपडीत बसले होते. "काय हो पहेलवान, काय चाललं हैं!" मी

म्हणालों. ते स्वच्छ हंसून म्हणाले, "जगांत कांही दिवस जिवंत राहायचं आहे ना, त्याची ही मशागत आहे! प्रकृति निकोप राखायची असली तर शरीर हें सांभाळलंच पाहिजे." मीं म्हटलें, "पण संसारी माणूस ह्या असल्या भानगडींत सहसा पडत नाही आणि तुम्ही मात्र अगदी दैव्यर व्हायचं ठरवलंसं दिसतें." तेव्हा ते म्हणाले, "दोन हात द्यायचे अन् दोन हात घ्यायचे ह्याची धमक नको का माणसांत? कुस्ती नाही खेळायची कुणाही पण आपलं..."

नाटकांत काम करण्याची शांतारामांना भारीच हौस! 'नागपूर नाट्य मंडळा' तर्फे गाजणाऱ्या नाटकांत ते आपली भूमिका चांगली वठवतात. विदर्भ-साहित्य संघाच्या गेल्या वर्षाच्या गोंदियाच्या अधिवेशनांत 'आंधळ्याची शाळा' या नाटकाचा प्रयोग झाला. शांतारामाकडे 'कुमार'ची भूमिका होती. शांताराम म्हणजे नायक बिंबा ह्या नायिकेवर रागावतांना जेव्हा मान खाली घालून रागावूं लागला तेव्हा मी जवळच्या एका प्रेक्षकाला विचारलें, "काहो, हा नायक हरघडी अशी खाली मान कां घालतो?" तो प्रेक्षक विनोदाने सांगू लागला, "नायकाला नायिकेच्या डोळ्याला डोळा भिडविण्याची लाज वाटत असावी." आणि प्रयोग संपल्यावर एक अस्सल नागपुरी मित्र शांतारामांना म्हणाला, "काबा बुवा, इतका गा काहून लटकी मान टाकत होताध तूं? काही बदल झाला कां गा तुह्यांत?" यावर शांताराम म्हणाले, "ए भाऊ, रंगभूमीवर येऊन काम कर जरा. मग दिसते देव चांगला. डोळ्याला डोळा भिडवणं मोठं सोपं आहे, पण जरा का डोळा अधिक भिडला तर नाटकच संपलं समज!" शांताराम अंगावर जराहि कांही येऊं न देतां असा कांही युक्तिवाद घालून निसटतात की माणसाने त्यांचें कौतुक करावें!

सर्व मित्रमंडळीचा मिलाफ व्हायची वेळ सायंकाळची. पहिलें स्थळ राजाराम वाचनालय. शांताराम दीडदोन मैलावरील आपल्या निवासस्थानाहून वाचनालयांत येतात. तसेंच शरच्चंद्र मुक्तिबोध, सीतावांत लाड, गो. रा. टोडके पां. ब. गाडगीळ, केशवराव केळकर, नानासाहेब जोग, अधूनमधून नागपूरला असल्यावर पु. भा. भावे इत्यादि मंडळीचा जोरदार जथ्था एखाद्या मैदानांत, टेकडीवर, स्मशान घाटावर किंवा एखाद्या चौरस्त्याच्या पुलावर रात्र उलटेपर्यंत बसून विविध विषयावर गप्पा मारीत बसतो. लहर आली की चहावर चहा, सिगारेटवर सिगारेट आणि पुन्हा बैठक अन् गप्पा. भारीच रंग चढतो मैफलीला. भाव्यांचें आवेशपूर्ण विषयप्रतिपादन, गाडगीळांच्या टीकेच्या चोंचदार फैरी आणि शांतारामांची जोरदार शिष्टाई धुमाकूळ घालून आसमंत हादरूं लागतो. समाजकारण, धर्मकारण आणि साहित्य यांवरील बहारदार चर्चा ऐकावी आणि मनांत तारे तोडीत घरीं परतावें! मनोरंजन आणि बोध व यांतच माणसाच्या स्वभावाचे पैलूहि ओळखायला सांपडतात माझ्या सारख्याला.

एकदा आम्ही सर्व हुरडा पार्टीला गेलों. अवघाती पावसाच्या मुसळधार सरीबरोबर वादाला जोरदार सुरुवात झाली. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति,

पुढाऱ्याचें धोरण, राष्ट्राचा आजचा प्रश्न, साहित्यिकांतील लाथाळी अशा सर्व विषयांवर साधक बाधक चर्चा झाल्यावर, एकाने टूम काढली हस्तरेषा पाहून प्रत्येकाचें भविष्य वर्तविण्याची; यानंतर दुसऱ्याने टूम काढली प्रत्येकाने एकतरी गाणें म्हणावें म्हणून. दोडक्यांनी आपलें नाकतोंड ओढलें. त्यांचें अनुकरण आणखी कांहींनी केलें. असें चाललें असतांनाच गाढगीळांनी आपला बारीक किरकिरा सूर लावला आणि त्या सुरांत शांतारामांनी आपला ग्रामोफोन जो सुरू केला तो सर्व पेंगायला लागले तरी बंद कांही होईना. मला वाटत होतें, भसाड्या आवाजांत शांताराम काय गातील! पण माझा कयास चुकला. 'पिया बीन नही आवत चैन' या करीमखाँच्या गाण्यापासून तों 'सावळाच रंग तुझा' ह्या माणीकबाई दादरकरांच्या आजच्या गीतापर्यंत! आणि आम्ही म्हणायचे—'वा पट्टे वा! काय तरी रंग तुझा'!—'बुलाता लाख हूँ लेकीन बराबर याद आते हैं' हें गाणें चालू असतांना मी डोळे चोळत म्हटलें, "अहो करीमसाहेब, जरा आता आवरतं घ्या ना! दोन वाजत आले की—" तेव्हा शांताराम नशेंत चढल्यासारखे म्हणाले, "अरे भाई, अभी हुआहि क्या? अभी अभी तो असली रंगत चढ़ रही है. भैरवी जो है!" अन् त्यांनी मानेला झटका देत सुरू केलें—'नको रे कृष्णा रंग सोडूं चुनरी भिजेतऽ' आणि मग 'लावणी ऐका हो लावणी' म्हणत—'सोड सोड सोड कृष्णा पदर धरूं नको सोड'—अन् ती चिरस्मणीय रात्र आमच्या सगळ्यावर अशी बेतली.

शांतारामांच्या दिलदार आणि खेळकर वृत्तीचे असे कितीतरी प्रसंग सांगतां येतील. भलतीच वर्मेंड बाळगण्याच्या भरीस ते सहसा पडत नाहीत. ऐकण्याची व ऐकविण्याची सहनशीलता त्यांच्यांत आहे. त्यामुळे सर्वांना ते जवळचे वाटतात. प्रसंगी हृदयाला हृदय भिडवून मदत करायला ते कचरत नाहीत. सुखदुःखाची त्यांना चांगली जाणीव आहे. त्यांच्यांत पोषाखी नीटनेटकेपणा असला तरी मित्रमंडळीत दिमाख मिरविण्याची प्रवृत्ति नाही. व्यासपीठावरून जरी नाही तरी व्यवहारांत ते समतेचा पुरस्कार करतात. दीनदुबळ्यांचें दुःख पाहून त्यांचें हृदय भरून येतें. ह्या अनेक सद्गुणामुळे मला त्यांचा अभिमान वाटतो आणि सायंकाळच्या त्यांच्या भेटींसाठीं मी रोज त्यांची वाट पाहतों.

शुभकामना

"तुमच्या 'युगवाणी'ची प्रगति मित्रत्वाच्या नात्याने व तुमच्या बद्दलच्या सद्भावनेने मी बघणार आहें. सवड झाल्यावरोबर मी 'युगवाणी'ला लेखनसाहाय्य अवश्य करीन."

ना. सी. फडके.

ग्रंथ-समीक्षा

सोन्याचे देव

मा. ज. कानेटकर
संपादक—"निःस्पृह"

☆

ता. १ नोव्हेंबर रोजीं स्थानिक कलाविकास थिएटरमध्यें त्यापूर्वीच गाजावाजा झालेला श्री. नाना जोग यांच्या "सोन्याचे देव" नाटकाचा नागपुरांतील पहिला प्रयोग प्रांताधीश नामदार श्रीमान् मंगलदासजी पक्वासा यांचे अध्यक्षतेखाली नागपूर नाट्य मंडळाने केला. सदर प्रयोगाने बरीच खळबळ उडवावी हें अपेक्षितच होतें. सोन्याच्या देवाची अहोरात्र पूजा करणाऱ्या समाजावर व अशा समाजाला ज्यांचें प्रत्यक्ष सहाय्य असण्याबद्दल नाटककाराने स्वतःचा गैरसमज करून घेतला आहे (व जो गैरसमज समाजांत प्रसृत व्हावा अशी त्याची मनोमय इच्छा असण्याचा संभव आहे) त्या समाजावर हल्ला करण्याच्या दृष्टीने स्वतःचे "सोन्याचे देव" पुढे दामटण्याची आज सोन्याची संधि आहे हें अचूक हेरणारे श्री. नाना जोग निःसंशय अभिनंदनास पात्र आहेत. "सोन्याच्या देवा"चें यश त्या नाट्यकृतीच्या स्वतःच्या श्रेष्ठत्वापेक्षा आज असलेल्या सार्वत्रिक असंतोषावर जास्त अवलंबून आहे हें स्वतः नाटककारहि नाकबूल करणार नाही. सबब आजचा असंतोष, त्याच्या पार्श्वभूमीच्या साहाय्याने समाजाला नजर करण्यांत आलेलें हें नाटक व त्याची प्रतिक्रिया यांचें समाजहितदृष्टया निर्विकारपणे परीक्षण करणें हें फार आवश्यक ठरतें. श्री. नाना जोग माझे मित्र आहेत. खासगी संभाषणांत त्यांनी तासन् तास दिलेल्या शिव्या हंसत हंसत सहन करण्याची माझी तितिक्षा त्यांच्या परिचयाची आहे. व्यक्तिहेतुप्रेरित लिखाण मी लिहीत नसतों आणि मनाला जें पटेल तें बिनमुर्वतपणे लिहिण्यास मी कचरत नाही हे माझे सर्व स्वभावविशेष त्यांच्या पूर्ण परिचयाचे असल्यामुळे माझ्या या परीक्षणामुळे त्यांचें हृदयपरिवर्तन करण्याच्या दृष्टीने पूर्णतः अयशस्वी ठरलों तरी माझें परीक्षण अत्यंत निष्कपट वृत्तीने लिहिलें आहे याबद्दल खुद्द त्यांनाहि शंका येणार नाही असा माझा दृढ विश्वास आहे.

मतभेदांतहि उद्देश एकच

एकाच देशाच्या भिन्न पक्षांत मतभेद असणें अत्यंत स्वाभाविक आहे. पण सर्वांचा उद्देश मात्र एकच असतो. निदान असावयास पाहिजे. देश व समाज यांना पुढे नेणें, जास्त सुखी करणें या एकमेव उद्देशानेच सर्व प्रेरित असतील तर

निदान बुद्धिक्षेत्रांत आम्हाला यत्किंचित्‌हि कटुता निर्माण न होऊं देता पूर्ण अभिनिवेशाने चर्चा करीत असताहि त्रास होणार नाही. टर उडविणें, नामोहरम करणें एवढाच आमचा उद्देश असूं शकत नाही. निरनिराळे पक्ष अगर त्या पक्षांतील व्यक्ति यांच्या सर्व हालचालीत व चळवळीत––मग ती कोणत्याहि क्षेत्रांत असो––त्यांत नाट्यसुद्धा आलें––देशभक्ति व देशोन्नतीची दुर्दम्य इच्छा अनुस्यूत हवी. सर्व विजिगीषु राष्ट्रांना ही किमान अट पाळावी लागते. दास्यशृंखलांतून नुकताच मोकळा झालेल्या या देशाला तर हें पथ्य फार कडक रीतीने पाळण्याची गरज आहे. कोणत्याहि कृतीचा अखेर उद्देश व परिणाम निःसंशय देशहिताचाच असला पाहिजे ही स्पष्ट गोष्ट विसरणें म्हणजे आत्मनाशाला आमंत्रण देण्यासारखें आहे.

नाटकाचा हेतु

या दृष्टीने "सोन्याचे देव" नाटकाचा हेतु काय असावा याचें उत्तर स्पष्ट मिळत नाही. याचें कारणच हें की नाटक अपूर्ण आहे. प्रस्तावनाकार वीर वामनराव जोशी म्हणतात, "या कूट प्रश्नाचा निकाल, माझ्या मते, काळावरच सोंपविणें बरें." नाटक असें लोंबत ठेवण्यांत नाटककाराचा कोणताहि हेतु असो पण मी मात्र त्याला संशयाचा फायदा देऊं इच्छितों. हेत्वारोप करणें हा आजच्या शिष्टसंप्रदायांत फार मोठा व अक्षम्य गुन्हा मानला आहे. तेव्हां जो हेतु स्पष्ट नाही त्याची मी माझ्यापरी व्याख्या केल्यास व त्या व्याख्येने नाटककारावर असद्‌-हेतूंचा आरोप मजकडून झाल्यास माझ्या पुढील परीक्षणाला निष्कारण सुरुंग लावल्यासारखें होईल. हें सर्व संकट टाळावें व माझें परीक्षण जास्तीत जास्त विशुद्ध राखावें या उद्देशाने मी नाटककाराचा हेतु अत्यंत शुद्ध आहे असेंच धरून चालतों. समाज व देश पुढे जावा, संकट व कष्टमुक्त व्हावा या एकमेव उद्देशानेच श्री. नाना जोग यांनी आम्हांला आपले "सोन्याचे देव" दाखविले असें आपण गृहीत धरूं या.

परिणाम

पण नाटकाचा परिणाम प्रेक्षकांवर काय झाला याबाबत मात्र मला तर्क करण्याचें कारण नाही. तें काम प्रेक्षकांनीच स्वयंस्फूर्तीने करून टाकलें. दोन अंकानंतर मी एका सन्मान्य मित्राबरोबर पहिल्या रांगेवरून तिसरा अंक पाहिला. नंतर चौथ्या अंकाकरिता स्वतःच्या न्याय्य जागी बसण्याकरिता खुर्च्यांमधील पायवाटेने परतलों, तेव्हा चार ठिकाणी मला हटकून माझ्या अनेक मित्रांनी बसविलें व मोठ्या खुषींत मला म्हटलें, "काय माधवराव! नाना जोगांनी आज मोठ्या हराशाने तुमचा––म्हणजे व्यक्तिशः तुमचा नाही, कांग्रेस वाल्यांचा––सूड उगवला, नाही!" हे सर्व सुशिक्षित होते. कांग्रेसचें श्राद्ध केव्हा होतें याची सबंध पंचवीस वर्षें बिचारे वाट पहात डोळे मिटण्यापूर्वी तरी कांग्रेसच्या तेरवीचे लाडू खाण्यास मिळावे ही एकमेव बिचाऱ्यांची उर्वरित इच्छा. नामदार गव्हर्नर

प्रयोगाला आले किंवा दादा धर्माधिकारी आणि वामनरावदादा यांनी श्री. नाना जोग यांच्या "चित्रशाळा" व "सोन्याचे देव" या नाटकांना अनुक्रमे प्रस्तावना लिहिल्या यांत वरील मंडळीना गव्हर्नर, आणि दोन्ही दादा यांचा दिलदारपणा दिसण्याऐवजी वरील त्रिमूर्तींना "बनविण्याचें" श्री. नाना जोग यांचें कौशल्य दिसलें. "सोन्याच्या देवा"चे हे परिणाम आहेत. हे परिणाम समाजाला पोषक आहेत की नाही हें आपण पाहूं म्हणजे "सोन्याचे देव" हे खरोखर सोन्याचे आहेत की पितळी आहेत हें आपोआप स्पष्ट होईल.

नाट्यशास्त्राचा सामान्य नियम

नाट्य हें फार प्रभावी साधन आहे. या साधनाचा कुशलतेने उपयोग करून नाटककार एका इष्ट गोष्टीचा (नायका मार्फत) एका अनिष्ट गोष्टीशी (व्हिलनशी) चाललेला झगडा दिग्दर्शित करतो. शेवटीं इष्ट गोष्ट जिंकते व प्रेक्षकांवर इष्ट गोष्टीचा ठसा उमटतो. हा ठसा दोन रीतीने उमटवितात. आनंद-पर्यवसायी नाटकांत नायक विजयी झालेला दाखवितात. वसुंधरेचा पुण्यप्रभाव सरतेशेवटी पाप्यांच्या पापकर्मावर विजय मिळवितो. दुःख पर्यवसायी नाटकांत अनिष्ट गोष्ट परमावधीला जाऊन केवळ परमावधीचें दुःख निर्माण करण्यांत यशस्वी झालेली दाखवून परोक्ष रीतीने सदर अनिष्ट गोष्ट त्याज्य आहे असा प्रेक्षकांवर परिणाम करण्यांत येतो. "तोच हा एकच प्याला" या धोक्याच्या सूचनेने संपणाऱ्या "एकच प्याला" नाटकाने दारूचे दुष्परिणाम "एकच प्याल्याला" विजय—परमावधीचें कष्ट निर्माण करण्यांत—देववूनच प्रेक्षकांवर बिंबविले आहेत. नाटकाचा उद्देशच असा की प्रयोग पाहण्यापूर्वी प्रेक्षक ज्या मुकामावर असतील त्यापेक्षा ते थिएटरमधून बाहेर पडतेवेळीं निदान मानवतेच्या सोपानावर एक पायरी वर चढून घरी परतले पाहिजेत. ज्या नाट्यकृतीने हें साध्य होत नसेल ती नाट्यकृति व्यर्थ होय हें उघड आहे.

"सोन्याचे देव" मध्ये जिंकला कोण?

या दृष्टीने वरील प्रश्न महत्वाचा आहे. "सोन्याचे देवां"त विजयश्रीने शेवटी भालेरावला माळ घातली. पुराणांतरींचा भस्मासुर जेव्हा स्वतःच्या निर्मात्या शंकराच्या डोक्यावर हात ठेवण्याकरिता धांवला तेव्हा शेवटी तोच जळून भस्म झाला पण नाना जोगांनी निर्माण केलेला भालेरावाचा भस्मासुर मात्र खुद्द नाटककाराच्या डोक्यावर हात ठेऊन सहीसलामत पळाला हें विशेषेकरून लक्षांत घेण्यासारखें आहे. असें करून नाटककाराने स्वतःचा संपूर्ण पराभव मान्य केला आहे.

घाण साफ करण्याकरितां जास्त घाण

भाऊसाहेबांचें जीवन घाणेरडें आहे, विसंगत आहे हें दाखविण्याकरिता भालेरावचा उपयोग केला आहे. आपण हॉटेलांत चहा पिण्यास गेलों व ट्रे मधील कप घाणेरडा आहे असें पोऱ्याला सांगितलें म्हणजे तो पोऱ्या स्वतःच्या खांद्यावरील

कपापेक्षांहि कितीतरी जास्त घाण असणाऱ्या कपड्याने तो कप साफ (?) करतो. त्या जास्त घाणेरड्या झालेल्या कपांत मिटक्या मारीत गिन्हाईक चहा घेतें. भालेरावच्या घाणेरड्या चिंधीने भाऊसाहेबांच्या जीवनाचा कप पुसून साफ करण्याचा प्रयत्न करणाऱ्या या नाटकाला पाहून मिटक्या मारणाऱ्यांच्या विशुद्ध जीवनाच्या कल्पना त्या गिन्हाइकापेक्षा जास्त तर्कशुद्ध आहेत असें मानण्याचें कारण नाही.

साम्यवादाची शरणचिठ्ठी

शान्तू हा जोगांचा अभिप्रेत हीरो पण भालेरावाने याला सुद्धां लंबा केला. भाऊसाहेबांना भालेरावाने बनविलें यांत मोठासा पुरुषार्थ नाही. पण त्या शान्तूला सुद्धां एक निमिषमात्र भालेरावावर विजय मिळविल्याचा आनंद होतो न होतो तोंच तो त्याच्या हातावर तुरी देऊन भालेराव पळावा व त्याने ललकारी मारून "तुम्ही नाही मारूं शकणार मला" असें जाहीर आव्हान द्यावें यांत श्री. जोगांना अभिप्रेत असणाऱ्या साम्यवादाचाहि संपूर्ण पराभव नाही काय? भाऊ-साहेबांना सर्वत्र दिसणाऱ्या अंधारांतून शान्तूकरवी निदान प्रकाशित पायरस्ता तर दाखवून द्यायचा असता! निदान भालेरावने जो स्वनाशाचा मंत्र सांगितला त्यांत एवढें तर त्याचेकडून वदवायचें असतें, "तुम्ही सोन्याच्या देवाचे भजक नाही मारूं शकणार मला. मला मारूं शकेल अशा शक्तीची उपासना शान्तू करीत आहे. आज जरी मी त्याच्या हातावर तुरी दिल्या असल्या तरी कधी तरी भाविष्यकाळी तो निर्माण करीत असलेली शक्तीच माझा नाश करील." म्हणजे बळेच कां होईना पण शान्तू हीरो ठरला असता व प्रेक्षक साम्यवादाबाबत गुंजभर आदर कनवटीला बांधून घरी गेले असते.

सर्वोदयालाहि शरणचिठ्ठीच

पण " सोन्याच्या देव " साम्यवादाच्या वतीने भालेरावलाच शरणचिठ्ठी देऊन थांबले असें नसून सरते शेवटी भालेराव करवी सर्वोदयाच्या चरणांवरहि त्यांनी डोकें टेवलें आहे. ज्या भालेरावच्या हातून आपण भाऊसाहेबांचा शेवटी (वाक्प्रहाराने) प्राण घेवविला त्याच भाऊसाहेबांना तुम्ही शरण जा असा सल्ला भालेरावच्या मुखाने अखेर आपण प्रेक्षकांना दिला आहे हें चाणाक्ष श्री. नाना जोग यांच्यासुद्धां लक्षांत राहिलें नाही.

याला कोण नरसिंह म्हणेल ?

भालेराव म्हणतो " पण तुम्ही सारे त्या नरसिंहाला जागृत करण्याऐवजी त्याचा ग्रामसिंह बनवूं पाहतां " आणि असें जोवर होत राहील तोवर भालेराव म्हणतो "मी मात्र चिरंजीव होईन." म्हणजे या नरसिंहाच्या सिंहपणाबद्दल "स्वयंमेव मृगेंद्रता" असें वर्णन करतां येत नाही. लोकांच्या मेहेरबानीवरच याचें नरसिंहपण आहे. लोकांनी जर याचा गाढव बनवला तर तो गाढव बनतो

असा नाटककाराने निर्वाळा दिला. यामुळे भालेराव चिरंजीव राहणार असें तो म्हणतो. म्हणजे भालेरावचा प्राण घेणारा नरसिंह जर निर्माण व्हायचा असेल तर कोणीतरी त्याचा गाढव बनविण्याची क्रिया थांबविली पाहिजे. नाटककाराचा व भालेरावचा या बाबतीतला रोख (शान्तूला मोकळा सोडण्याचें एकहि स्पष्ट कारण नसतां) सर्वस्वी भाऊसाहेबांवर आहे. भाऊसाहेब व तत्सम लोक जर या नरसिंहाचें गाढव बनविण्याचें थांबवितील तरच हा नरसिंह जागा होणार हें स्पष्ट आहे. अगदी हेंच करण्याचा सर्वोदय प्रयत्न करीत आहे. त्याला अजून यश मिळालें नसेल. कदाचित् शान्तूमुळेच हें यश पदरांत पडण्यास उशीर होत असेल, पण जो नरसिंह जागा झाल्याशिवाय भालेराव मरणें शक्य नाही व जो गाढवीकरणाच्या कचाटींत सांपडला आहे त्याला सर्वोदयाने व गांधीवादी लोकांनी तरी आपल्या पुरता मोकळा केला आहे. हा श्लेष लक्षांत घेतला म्हणजे भालेरावाने शेवटी स्वतःच जाताजाता सर्वोदयाचें समर्थन करून श्री. नाना जोगांच्या अजस्र प्रयत्नांची वाफ कशी पूर्णपणे दवडिली हें वाचकांच्या लक्षांत येईल.

हवेंत हातवारे

या नाटकांत येथून तेथवर कांग्रेस व गांधीवादी लोक यांच्यावर हल्ला चढविण्याच्या दृष्टीने बऱ्याच प्रमाणांत हवेंतच हातवारे केले आहेत. जें मुळांत नाही तें गृहीत धरायचें व नंतर आवेशाने त्याला झोडपायचें ही फार मामूली चाल आहे. गांधीवाद ही या नाटकांतील एक मोठी महत्वाची मान्याची जागा आहे पण खरोखरच आज जितक्या म्हणून महान् विभूतींच्या नांवावर "वाद" सुरू झाले असतील त्या सर्वांपैकी स्वतःच्या नांवाचा "वाद" आपल्या पश्चात् अस्तित्वांत राहूं नये याबद्दल तीव्र इच्छा असून त्या बरहुकुम शिकस्तीचा प्रयत्न स्वतःच्या ह्यातींत म. गांधींनीच केला. आजचा गांधीवाद हा गांधीजींच्या शिष्यांमुळे आहे व त्याची जबाबदारी गांधीजीवर टाकणें योग्य होणार नाही. पण असें कां होतें हें जर आपण ओळखलें तर आपणांस आश्चर्यहि वाटणार नाही. सामान्य माणूस बुद्धीचे बाबतीत एक तर हिणकस तरी असतो किंवा आळशी असतो, म्हणून एखाद्या अद्वितीय पुरुषाने अलौकिक विचारसरणी पुढे मांडली की त्या विचारसरणीचा आधार घेणारे हजारो लोक निरनिराळ्या कारणांमुळे पुढे येतात. सुरवातीला प्रामाणिक लोक पुढे येतात. मग या गर्दीला महत्व येऊं लागतें, मान्यता मिळते व पुढे तर अशी परिस्थिती येते की ती विचारसरणी प्रत्यक्षतः फायदेशीर ठरते. असें झालें म्हणजे तींत विकार उत्पन्न होतो. आधीच विकृत असलेले लोक या मंडळींत शिरूं पाहतात व सदर वाद अधःपाताच्या मार्गावर चालू लागल्यासारखा दिसतो. पण हा अपरिहार्य क्रम आहे. क्रमाबद्दल कोणत्याहि विचारप्रणालीच्या प्रवर्तकाला जबाबदार धरणें अन्यायाचें आहे. प्रत्येक माणूस कोणतीहि विचारसरणी उघड्या डोळ्यांनी व बुद्धि शाबूत ठेवून जर ग्रहण करील तर कोणत्याहि अर्थाने वाद हे बोकाळणार नाहीत. वाद म्हणा किंवा संस्था म्हणा या सर्व याच क्रमाने घसरणीला लागतात. त्यांत म. गांधींच्या विचारसरणीला

एकटें वेगळें काढून झोडपण्यांत विशेष औचित्य आहे असें वाटत नाही. या चक्रांतून सुटली अशी एकहि विभूति अगर विचारसरणी जगाच्या इतिहासांत दाखवितां येणार नाही.

इतिहासाचा क्रम

पण समजा गांधीवाद म्हणून कांही चीज म. गांधीजींनी सुरू केली असली तरी मार्क्सपेक्षा त्यांचे हक्क कमी कां असावे? मार्क्सवाद असण्याबद्दल ज्यांना हरकत नाही त्यांना गांधीवाद असण्याबद्दल एवढी चीड वाटण्याचें कारण काय? त्यांनी पाहिजे तर गांधीवाद मान्य करूं नये पण तो नष्ट व्हावा याबद्दल अट्टहास बाळगण्याचें कारण काय? सोन्याच्या देवाची जगाच्या सुरवातीपासून पूजा सुरू आहे व सोन्याच्या देवांना पदच्युत करण्याच्या दृष्टीने गांधीवादापूर्वी मार्क्सवाद निघाला आहे. मार्क्सवाद जर यशस्वी झाला असता तर गांधीवाद निर्माण होण्याचें व श्री. नाना जोग यांना "सोन्याचे देव" नाटक लिहिण्याचें कारणच उरलें नसतें. पण "सोन्याचे देवा"ने ऐट अशी आणिली आहे कीं "सोन्याची पूजा वाढविण्याकरितांच" गांधीवादाचा जन्म झाला आणि हें महत्संकट टाळण्याकरिता म्हणून मार्क्सवादाच्या वतीने अलिकडे त्याच्यावर हल्ला चढविण्यांत येत आहे. हा वस्तुस्थितीचा अक्षम्य विपर्यास आहे व वाचक व प्रेक्षक यांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा प्रयत्न आहे. भांडवलवाद नष्ट करण्याकरिता मार्क्सवाद निघाला असेल तर आपल्यापरीने भांडवलवादाचे दुष्परिणाम नष्ट करण्याच्या उद्देशानेच गांधीवादहि निघाला. भांडवलवादाचा पुरस्कार करण्याकरिता गांधीवाद प्रयत्न करीत आहे असें म्हणणें अगदी अयथार्थ आहे. व्यक्तिश: उदाहरणांच्या भरंवशावरच जर गांधीवादाला भांडवलाचा पुरस्कर्ता मानण्याचें ठरविलें तर या पद्धतीने साम्यवादी, मजूरवादी, शेतकऱ्यांचे पुरस्कर्ते या सर्वांबाबत त्यांच्या उच्चारित ध्येयाशी ते स्पष्टपणे विरोध करीत आहेत हें सहज दाखवून देतां येईल. म्हणजे गांधीवाद असलाच तरी भांडवलवाद व साम्यवाद यांच्यामध्ये आहे आणि मूळ भांडवलवादापासून निदान चार पावलें योग्य दिशेने पुढे गेला आहे याबद्दल तो अभिनंदनीयच मानला पाहिजे.

गांधीवादाचें वैशिष्ट्य

गांधीवादाने अजून संपूर्ण यश मिळविलें नसेल. मधेंच गांधीवाद्यांना राज्यकर्तेपण मिळाल्यामुळे त्यापैकी कांही भ्रष्ट झाले असतील. कांही पूर्वीच भ्रष्ट असलेले व स्वराज्यापूर्वी गांधीवादापासून अनेक कोस दूर असलेले लोक आज बळेंच पांढरी टोपी घालून गांधीवादाला गुदमरून टाकीत असतील पण यामुळे गांधीवाद कसा त्याज्य ठरेल? अजून मार्क्सवाद सुद्धा पूर्णत: यशस्वी झाला नाही पण तेवढ्यावरून मार्क्सभक्तांनी तो वाद त्याज्य ठरविला नाही. मग गांधीवादावरच जुलुम कां?

गांधीवादाचें मर्म ओळखण्यासारखें आहे. भांडवलवाद त्याज्य कां? तर सोन्याच्या देवाची आराधना सुरू असली म्हणजे बहुंश समाज नाइलाजाच्या दावणींत

गोवला जाऊन मोजक्या लोकांचा मौताज बनतो. या अनन्यगतिकत्वांतून समाजाला सोडविण्याकरिता मार्क्सवाद जन्मास आला. पण दुर्दैव असें आहे की या मार्क्सवादाचें भलें बुरें प्रात्यक्षिक सुरू असलेल्या रशियांत नाइलाजाची सोनेरी दावण जरी नाहीशी झालेली असली तरी सोन्याऐवजी तेथे आता शिस्तीची दावण सुरू असून शिस्तीचे गोंडस नांवाखाली बहुंश लोकांना पूर्वी इतकेच मौताज करून ठेवलें आहे. अमेरिकेंतील सामान्य नागरिक व रशियांतील सामान्य नागरिक यां पैकी जास्त मौताज कोण, जास्त अनन्यगतिक कोण याचें उत्तर त्या दिवशी थिएटरमधे गांधीवादाची टर उडविली जात असतां टाळ्या पिटणाऱ्या-पैकी कोणीहि देऊं शकणार नाही. ही कठीण समस्या गांधीवाद सोडवूं पहात आहे. सोनें म्हणा की शिस्त म्हणा, दोन्ही पद्धतींत जी नाइलाजाची मजबूत वेसण सर्वांच्या नाकांतून जाऊं पाहते ती वेसण नसणारा समाज निर्माण करावा हें गांधीवादाचें ध्येय आहे. ध्येय कठीण आहे म्हणूनच तें साध्य होण्यास उशीर लागत आहे. गांधीवादाला एकीकडे भांडवलशहा शिव्या देतात कारण त्यांना वाटतें तो समतावादाचा पुरस्कार करतो व दुसरीकडे साम्यवादी शिव्या देतात कारण त्यांच्यामते तो भांडवल-शहांचा समर्थक आहे. यांतच गांधीवादाचें समर्थन व वैशिष्ट्य आहे. हें न ओळखता गांधीवादाची टर उडविणें शक्य आहे. अशा टवाळींत प्रेक्षकांना आनंद वाटणेंहि शक्य आहे पण या धुळवडीमुळे म. गांधींच्या सिद्धांताचें अमोघत्व मात्र कलंकित होऊं शकत नाही.

विसंगती आणि तारतम्य

या नाटकांतील हास्यरस व टीका यांची मदार सर्वस्वी भाऊसाहेबांतील विसंगतीवर आहे. ही विसंगती निर्माण करतांना आपण त्यांना इतके लेपसट बनविलें आहे कीं खरोखर ते सर्वोदयाचे प्रतिनिधीच उरले नाहीत याचें सुद्धा भान नाटककाराला राहिलें नाहीं. महात्मा गांधींमधे जो कणखरपणा होता त्याचा अंशहि भाऊसाहेबांत दिसत नाही. असा कृत्रिम प्रतिनिधी निवडून त्यावर मात झालेली दाखविण्यांत फारसा पुरुषार्थ आहे असें म्हणता येणार नाही. साम्यवादाचा असाच बुळा प्रतिनिधी निर्माण करून त्याच्या चिंध्या उडलेल्या दाखविणारें नाटक सहज लिहितां येईल. पण भाऊसाहेब कशाला, खुद्द गांधीजी-नाहि विसंगतीबद्दल त्यांच्या टीकाकारांनी दोष दिला आहे. तसें कशाला? खुद्द रामकृष्णादिकांनाहि याच अपराधाबद्दल दोष देणारे अनेकांच्या परिचयाचे असतील. भीष्म, द्रोण, शुक्राचार्य यांना तर भाऊसाहेब व इतर "चिल्लर" आचार्यांसकट याच नाटकांत निकालांत काढलें आहे. ही विसंगती स्वतः मद्य औषधा पुरतीहि नाही अशी ऐट असणारे मजूर पुढारी, समाजवादी, साम्यवादी, इ० माझ्या परिचयाचे आहेत पण भाऊसाहेबांची विसंगती जिच्या पासंगासहि पुरणार नाही अशी भक्कम विसंगती भाऊसाहेबांना हंसणाऱ्या प्रत्येकांत दाखवून देतां येईल. ज्याच्या जीवनांत विसंगती नाही असा प्राणी निर्माण करण्यास प्रत्यक्ष

 ब्रह्मदेवसुद्धा असमर्थ आहे. मग या विसंगतींत तारतम्य बाळगण्याचें शास्त्र कोणतें ?

हें मात्र सोपें आहे. वातावरणांत धूळ ही अपरिहार्य आहे. म्हणूनच ज्या दिवाणखान्यांत झाडलोट करण्याकरिता एक माणूस सतत कापड मारीत असतो अशाहि दिवाणखान्यांतील लांकडी सामानावर बोट फिरविलें तर बोटाला थोडी फार धूळ नेहमी लागेल. आणि हीच दिवसभर गोळा केलेली धूळ एका ठिकाणी गोळा करतात त्या जागेला कचराघर म्हणतात. आता कचराघरांत जशी धूळ आहे तशीच अत्यंत थोडी कां होईना पण दिवाणखान्यातल्या खुर्चीवरहि आहे. एवढ्याच मुळे जर तें कचराघर या खुर्चीला म्हणालें, "बये! कशाला ग ऐट करतेस? तुझ्याहि अंगावर धूळ आहे. जरा बोट घासून पहा म्हणजे दिसेल." या नंतर खुर्चीने काय उत्तर द्यावें? अगदी हीच गत टीकाकारांची असते. मग या बाबतींत महत्त्वाचा प्रश्न एवढाच आहे की एखादी व्यक्ति स्वतःच्या जीवनांतील विसंगतीची धूळ सतत साफ करीत आहे की स्वतःच्या जीवनाला विसंगतीच्या धुळीचें कचराघर बनवीत आहे? या प्रश्नाचें उत्तर गांधीवादाचे बाबतींत स्पष्ट आहे. गांधीवाद आज चौकावर उभा असल्यासारखा आहे. अत्यंत आणिबाणीच्या काळीं म. गांधी आमच्यांतून निघून गेल्यामुळे गांधीवाद आता कोणत्या मार्गाने जाणार हें कदाचित संदिग्ध असेल पण त्यामुळे तो दिवाणखाना अजून कचराघर बनला नाही हें खास. बरेच दिवस झाडलोट न झाल्यामुळे आपण वैतागाने पाहिजे तर म्हणावें, "काय या दिवाणखान्याचा उकिरडा बनला आहे" पण ती स्पष्टपणे अतिशयोक्ति व भाषेचा अलंकार आहे हें उघड आहे.

असें होऊं शकलें असतें.

भाऊसाहेबांना सर्वोदयाचे मजबूत प्रतिनिधी दाखविलें असतें, खोटे कॉंग्रेसवाले भांडवलशाहीशी संगनमत करून त्यांचे सर्व प्रयत्न म्हणून पाडीत असल्याचें दाखविलें असतें, शान्तूच्या तोंडून जर म्हटलें असतें की खोटे कांग्रेसवाले स्वतःच्या लीला न थांबवितील तर शेवटी भाऊसाहेबांचें पुढारीपण शान्तूच्या सिद्धांताला मिळाल्याशिवाय राहणार नाही; तर नाटककाराला जो परिणाम हवा होता तो तर झालाच असता पण कांग्रेसवाल्यांनाहि अशा वास्तववादी कथानकाचा इन्कार करतां आला नसता. पण सारेच कांग्रेसवाले भालेरावला मूर्ख दिसले. त्यामुळे भालेरावच्या तारतम्यावर कोणाचा विश्वास बसेल? कांग्रेसवाले या ऐवजी इतर कोणत्याहि पक्षाचें नांव लिहून तेंच वाक्य एखाद्या नाटकांत एखाद्या पात्राच्या तोंडीं घालून अगदी तेवढाच हास्यरस निर्माण करतां येईल. पण तें हास्याकरितां हास्य झालें. अशा नाट्यकृतीबद्दल आदर वाटणें जवळ जवळ अशक्य आहे.

नमुनेदार उदाहरण

"म्युनिसिपालिटी"च्या मानाने "सोन्याचे देवा" चा परिणाम जवळपास शून्यवत् म्हटला तरी फार तर क्षम्य अतिशयोक्ति होईल. याचें कारणच हें की वास्तववादी विडंबन या नात्याने "म्युनिसिपालिटीने" उच्चांक गांठला आहे. फाजील धार लावण्याचा प्रयत्न केल्यामुळे धार तुटलेल्या वस्तऱ्याने जशी समाधानकारक

हजामत होऊं शकत नाही तशासारखी गत "सोन्याचे देवा"ची झाली आहे. कथानकाला जास्त वस्तुस्थितीनिष्ठ ठेवलें असतें तर खुद्द श्री. नाना जोगांना अभिप्रेत असणारा परिणाम निःसंशय अधिक झाला असता.

नाट्यतंत्र

पाश्चात्य रंगभूमीने स्वीकारिलेलें एक प्रवेशांकी नाट्यतंत्र शेकडा नव्वद पावेतो निरक्षर असलेल्या देशांत कितपत परिणामकारक होईल याबद्दल मतभेदास वाव आहे पण हा त्या त्या नाटककाराचा प्रश्न आहे. हें तंत्र अनेक सुशिक्षित प्रेक्षकांच्या सुद्धा डोक्यावरून साफ उडून जात असेल. तेव्हा "दारिद्रिनारायणाला" साम्यवाद समजावून सांगण्याचें चुकून जर या नाटकाचें उद्दिष्ट असेल तर तें त्यांच्या दृष्टीने अरण्यरोदनच ठरणार आहे. याचप्रमाणे थोडासा मतभेद इतरत्र लहान सहान बाबतींत संभवतो; पण तेवढें रुचिस्वातंत्र्य नाटककाराला अवश्य हवें. एक गोष्ट मात्र नमूद केली पाहिजे. विनोदाच्या मर्यादा कोणत्या? त्यासाठी कांही नीतिनियम पाळणें अवश्य आहे काय? मला वाटतें, होय. प्रस्तुत नाटकांत एक इंग्रज जोडपें बळी देऊन त्यांच्यावरून विनोद साधण्याचा नोकराकरवी प्रयत्न केला आहे. चपराशी इंग्रज बाईला "रांड" म्हणतो आणि "मेरी मेम साहेब" अशी तिच्या नांवावर अनुचित मखलाशी करतो. इंग्रजी रंगभूमीवर हिंदुस्थानी जोडप्याचें असें विनोदीकरण केलें असतें तर आपल्याला असेंच हंसतां आलें असतें कां? आपण स्वतंत्र झालों आहोंत. इतर राष्ट्रांच्या भावना केवळ विनोदाकरिता विनाकारण दुखविणें आंतरराष्ट्रीय नीतिनियमाच्या विरुद्ध आहे. श्री. नाना जोग यांना माझी अशी अत्याग्रहाची सूचना आहे की पुढील आवृत्तींत त्यांनी एवढा भाग अवश्य वगळावा. येथे नाट्यविषयाचा मतभेद नाही. पण सामान्य शिष्टतेला आवाहन आहे. प्रेक्षकांना अशा रीतीने हंसवून एका नुकत्याच स्वतंत्र झालेल्या राष्ट्राची अज्ञानमूलक हीन अभिरुचि जागविणें क्षम्य नाही.

सारांश

हें नाटक विधायक नसून विनाशक आहे. त्यांत समाजाला एकहि निश्चयात्मक व उपकारी अशी शिकवण दिलेली नाही. हें नाटक पाहिल्यानंतर प्रेक्षक वाढत्या विकृतीच्या धुंदीत बाहेर पडतो. भालेरावला गांधीटोपी घातल्यावर विकृतीचा अनुभव येई पण; हें नाटक पाहिल्यावर सामान्य प्रेक्षकांत दुसऱ्याच्या डोक्यावरहि असलेली गांधी टोपी पाहतांक्षणी वेड लागेल अशी पात्रता निर्माण होते. ही या नाटकाची करामत आहे; हा या नाटकाचा सारांश आहे.

हें नाटक विकृतिमापन यंत्राचें काम मात्र अतिशय चांगलें करूं शकेल. हें नाटक पाहिल्यावर एखाद्या प्रेक्षकाला ज्या प्रमाणांत गुदगुल्या होतील त्यावरून त्या प्रेक्षकाची सारासार बुद्धि, तारतम्य, तर्कप्रियता, जबाबदारीची जाणीव,
 देशप्रेम, समाजहितैषीवृत्ति इत्यादि गुणांच्या अस्तित्वाचें किंवा अभावाचें माप सहज

व स्पष्ट ठरवितां येईल. कांग्रेसबद्दल जनतेंत कितपत असंतोष आहे व वातावरण कितपत गंभीर आहे याचेंहि भारमापन या नाटकामुळे होईल. चाणाक्ष व कांग्रेस आणि सर्वोदय यांच्या अनूची चाड असणाऱ्या गांधीवादी लोकांनी या नाटकाचा या दृष्टीने उपयोग करून घेण्यास मुळीच हरकत नाही. या नाटकाला प्रेक्षकांची गर्दी असल्यास आपण गांधीवादापासून किती दूर आहोंत हें कांग्रेवाल्यांनी स्वतःच तपासून पाहावें. आम्ही जसजसे गांधीवादाजवळ राहूं तसतसे या नाटकाचे प्रेक्षक आपोआप कमी होतील. या दृष्टीने कांग्रेसवाल्यांनी या नाटकावर रागावण्याचें मुळीच कारण नाही.

हें नाटक यशस्वी होईल व श्री. नाना जोगांना मोठ्या नाटककारांच्या यादींत बसवील असा त्यांच्या अनेक चाहत्यांचा कयास आहे. मोठ्या नाटककाराचे सर्व गुण त्यांच्यांत आहेत हें मलाहि कबूल आहे. पण "सोन्याच्या देवा"च्या फंदात पडून श्री. नाना जोगांनी थोडा उलट दिशेनेच प्रवास केला आहे. धोतर धुण्यास जावें पण साबण लावण्यापूर्वी प्रथम तें चिखलांत पडावें तशागत हें झालें. प्रथम हा चिखल जेव्हा धुवून निघेल तेव्हा कोठे मग जोगांचा मोठ्या नाटककाराच्या दिशेने प्रवास सुरू होईल. श्री. नाना जोगांनी मोठें नाटककार व्हावें असें मलाहि वाटतें पण समाजाच्या मनाला विकृत आणि थोड्या फार प्रमाणांत अधःपतित करणारें नाटक लिहून मोठा झालेला नाटककार माझ्या ऐकिवांत नाही. क्रांति जरी अभिप्रेत असेल तरी मानसिक उत्थान करणारें नाटकच लिहावें लागेल. भालेरावच्या गळ्यांत विजयश्रीची माळ घालणारें नाटक स्वतःच्या पित्याला मोठें बनविण्यास सर्वस्वी असमर्थच ठरेल.

शुभकामना

"...'युगवाणी'चें संपादकत्व तुमच्याकडे आल्याचें कळलें. काळ बदलला आहे. टिळक, आगरकरांच्या उदयाच्या वेळीं समाज साहित्यिकाकडून ज्या अपेक्षा करीत होता तशाच प्रकारच्या पुनः एकदा तीव्रतेने साहित्यिकाकडून केल्या जाण्याचा काळ अगदी जवळ आला आहे. अशावेळी तुमच्या संपादकत्वाखाली 'युगवाणी' आपलें नांव सार्थ करो असें मी मनःपूर्वक इच्छितों.

'युगवाणी'चा दिवाळी अंक चांगला होता. विशेषतः कोलते यांचा लेख मार्मिक वाटला. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला दुसरी बाजू नाही असें नाही. त्यांच्या लेखाचा उत्तरार्ध प्रसिद्ध झाल्यावर शक्य झालें तर ती थोडक्यांत मांडीन. सवड होतांच 'युगवाणी' साठी कांही तरी पाठवून देईन..."

—वि. स. खांडेकर

नादलुब्धाच्या स्मृतिलहरी

(४)

दरबार गायक रामभाऊ गुळवणी

मधुकर श्रीधर मंगरुळकर

☆

श्री. वसंत शांताराम देसाई यांचें 'मखमालीचा पडदा' हें पुस्तक मीं नुकतेंच वाचून संपविलें होतें. मराठी रंगभूमीचा इतिहास, कोणत्याहि प्रकारचा दूषित दृष्टीकोन न ठेवतां, सांगितलेला हा पहिलाच ग्रंथ. बारिक सारिक तपशीलाने परिपूर्ण असा हा ग्रंथ वाचून, न्यायदानाचें पवित्र कार्य करणारा माणूस, आपल्या इतर व्यवहारांतहि किती सरळ, चोख व निःपक्षपाती असतो याचें प्रत्यंतर या पुस्तकाने मला आलें होतें. त्या पुस्तकांत एकप्रकारचा सुरेलपणा आहे. कुठेहि कणसूर किंवा बदसूर वाटत नाही. सवाई गंधर्वाचे शिष्य श्री. भीमसेन जोशी यांच्या गायनाच्या बैठकीशी, या पुस्तकाची मला तुलना करावीशी वाटते. स्वरांचा अखंड भरणा चालू; कुठेहि स्वर तुटायचा नाही, वर्जित स्वराला हात लागणार नाही, की कांही नाही. एखाद्या गर्ती आणि कुलीन स्त्रीसारखी धीरगंभीर चाल. कुठेहि लचक नाही किंवा कंबरमोड नाही. स्वरांच्या बढतीप्रमाणे प्रतिपाद्य विषयाची बढत सारखी चालू. वसंतरावांनी असे अनेक पडदे हळूवार हाताने उचलून दाखविले आहेत. एखाद्या धीरगंभीर रागाशी या पुस्तकाची तुलना करायचा मोह आणखी एका गोष्टीमुळे होतो. एखाद्या रागांत वेगवेगळ्या स्वरांचा भरणा झाला तरी वादी आणि संवादी स्वर स्पष्टपणे वारंवार आपलें रूप प्रकट करीतच असतात. त्याप्रमाणे या पुस्तकाचा वादीस्वर म्हणजे गंधर्व नाटक मंडळी. नारायणराव राजहंसाबद्दल श्री. देसायांना जी आत्मीयता वाटते ती या पुस्तकांत वरचेवर डोकावली आहे.

हें पुस्तक वाचून संपलें त्याच सुमारास ग्वालेर दरबारचे गायक श्री. रामभाऊ गुळवणी यांचें नागपूरास आगमन झालें. रामभाऊंच्या खेळीमेळीच्या आणि मित्र जोडण्याच्या स्वभावधर्मामुळे, त्यांनी नागपूरास बरेच मित्र गोळा केले आहेत. आठ वर्षांपूर्वी रामभाऊंनी महाल अमेच्युअर्स या हौशी नाट्यसंस्थेतर्फे झालेल्या नाट्यप्रयोगांत कामें केलीं होतीं. डॉ. दामले, श्री. गोखले वगैरे मंडळी त्यांच्या तेव्हापासून परिचयाची. सात आठ

वर्षांच्या काळानंतर रामभाऊ नागपुरास येऊनहि या साऱ्या मंडळींत एकदम रमले. माहेरपणाला आलेली नवोढा आपल्या माणसांत इतकी मिसळून जावी की मध्ये गेलेल्या कालखंडाची तिला विस्मृति व्हावी असें त्यांना झालें होतें. श्रीमंत बाबूराव देशमुखांकडे त्यांचा मुक्काम होता. बाबूरावांच्या रसिकतेबद्दल, आपुलकीबद्दल, त्यांच्या मार्मिक रसग्रहणाबद्दल दिलदार अशा कितीतरी गोष्टी रोज त्यांच्या तोंडून ऐकायला मिळत. पूर्वीच्या काळीं राजेलोकांच्या पदरीं कलावंत असत, परंतु हल्ली श्रीमंत बाबूरावासारखा माणूस विरळाच. रामभाऊसारख्या परप्रांतीयाने आमच्या येथील एका व्यक्तीबद्दल' धन्योद्गार काढलेले पाहून आमच्या अंगावर मूटभर मांस चढत असे. कारण तो वैयक्तिक चांगुलपणा बाबूरावांचा असूनहि नागपूरच्या मोठेपणाला कारणीभूत होता.

बाबूरावांच्या रसिकतेची एक गोष्ट सहज आठवली म्हणून सांगतों. त्यावेळी रामभाऊंचा मुक्काम त्यांच्याकडे होता. नागपूरला संगीत संमेलन भरलें होतें. त्यानिमित्त ठिकठिकाणचे गायक व वादक आले होते. रजबल्लीखांसाहेबांपासून पखवाजीये सखारामपंत, सरोदिये हाफिजअली पर्यंत सर्व नागपूरांत जमलेले. या कलावंतांना बाबूरावांनी मेजवानी दिली. सगळे कसलेले कलावंत तो थाट पाहून दिपले. मुकाट्याने जेवण बरें चालेना. कुणीतरी श्लोक म्हणायला सुरवात करावी ही प्रत्येकाची इच्छा, पण म्हणावा कुणी ? इथल्या शिस्तीच्या विरुद्ध होईल कां ? रामभाऊ बाबूरावांच्या मागून पंक्तींत हिंडत होते. रजबल्लींनी त्यांनाच इशारा केला. रामभाऊंनी एकदम तान फेकून श्लोक सुरू केला. निरभ्र आकाशांत नागमोडी वीज चमकून गेली. तोच सूर बाकीच्यांनी धरला. रजबल्लीखां साहेबांनी देखील श्लोक म्हटला. बाबूराव म्हणाले, "रामभाऊ, कुणी सांगितलं श्लोक म्हणायला?"

'कुणी नाही, पण प्रसंगाची शोभा—'

'हो, पण मंडळी उपाशी राहतील ना—'

केशवराव भोसले आणि बालगंधर्व यांच्या संयुक्त मानापमानाची आठवण त्या दिवशीं झाल्यावाचून राहली नसेल.

'रामभाऊ म्हणजे नाट्य व्यवसायांतून निवृत्त होऊन गायकाच्या महत्पदास पोचलेले ! ललितकला कंपनींतून १९२० सालीं माधवराव वालावलकरांसमवेत त्यांनी गंधर्वमंडळींत प्रवेश केला होता. ललितकलेंत असतांना 'संन्याशाच्या संसारां'तील 'दुलारी'च्या भूमिकेंतून प्रेक्षकांवर रामभाऊ भाव मारून बसले होते. तेरा वर्षे गंधर्व कंपनींत अधूनमधून काम करून त्यांनी 'केशव संगीत मंडळी' आणि 'भोसले संगीत मंडळी' या कंपन्यांची आपल्या गुरूच्या म्हणजे कै. केशवराव भोसले यांच्या स्मरणार्थ स्थापना केली होती.'

वसंतराव देसायांनी सांगितलेली ही माहिती माझ्या मनांत ताजीच होती. नाट्यसृष्टीचा संबंध सुटला असला तरी आपल्या अंगच्या गुणांनी, जनतेवर

आपला ताबा अजूनपर्यंत टेवणारे केशवराव दात्यांसारखे नरश्रेष्ठ अजून अस्तित्वांत आहेत. त्यांच्याविषयी मला आदर आहे. याच मालिकेंत मी रामभाऊंनाहि बसवितों. अशा अलौकिक व्यक्तीची ओळख व्हायची अनायासे संधी आली होती. रामभाऊंची भेट कशी होईल अशी मनाला हाव होती. अशा स्थितींत रामभाऊंच्या सहवासाचा लाभ मला एके दिवशी अनायासे झाला.

मी श्री. लाड यांचेकडे बसलों होतों. वाऱ्यावरच्या वऱ्याच गप्पा झाल्या. नंतर कवि श्री. शरतचंद्र मुक्तिबोध एका नवीन, किरकोळ अंगाच्या गृहस्थाला घेऊन तिथे आले. सौ. हिराबाई बडोदेकरांचे सारंगीवादक श्री. बापुराव कुमेटकर यांच्यासारखे ते गृहस्थ मला भासले. जाड्याभरड्या खादीचा लांब कुडता त्यांनी घातला होता. तसलेंच धोतर आणि डोळ्याला चष्मा! नट म्हणून ओळखू येण्यासाठी ज्या अनेक गोष्टी लागतात, त्यांची एकजात अनुपस्थिति मला त्यांचे ठिकाणीं जाणवली. श्री. लाड यांनी 'या रामभाऊ'—अशी सलामी देतपर्यंत मला त्यांची ओळख पटणें शक्य नव्हतें. नटाचा पोशाख, त्याची भिवयांना टेकणारी (गंधर्व) टोपी, केसांचा हापकट—आणि स्त्रीनटांना अनुकूल अशी खासगी आयुष्यांतली चालचाल, या गोष्टींच्या अभावामुळे मला हे नट ओळखू आले नाहीत. बॅर, गवई म्हणून ओळख पटायला दहाबारा गुंड्याची लांब अचकन, कोल्हापुरी फेटा किंवा मंजीखाँची आटवण करून देणारी चांदीच्या मुटीची छडी, रुबाबदार गलमिशा वगैरे म्हणाव्या तर तेंहि नाही. या सऱ्याच गोष्टींशी रामभाऊंची फारकत झालेली. त्यांनी उलट हंसत नमस्कार स्वीकारून—' 'कसें काय मंडळी—' असें म्हणून बोलायला सुरवात केली—,

रामभाऊंच्या नागपूरला झालेल्या दोन तीन बैठकीवरून मला असं कळलें होतें की रामभाऊ मागे तंबोरा धरणाऱ्याला स्वरहि लावूं देत नाहीत. मला ही गोष्ट त्या प्रथम दर्शनांतच पटली. कारण त्या दिवशी रामभाऊ जवळ जवळ एकटेच बोलत होते असें म्हणायला हरकत नाही. टेलीफोनवर कोणी बोलत असतांना जसें आपल्याला वाटतें तसाच कुणाचा समज झाला असता तर नवल नव्हतें. आमच्या ओळखी झाल्या. आमच्यापैकी माझे मित्र नटवर्य सखारामपंत जोशांवर त्यांची नजर एकदम गेली. कारण केशवराव दात्यांचे शिष्य म्हणूनच मुळांत त्यांची ओळख करून देण्यांत आली होती. त्यांच्या नाटकाबद्दल गोष्टी सुरू झाल्या. थोड्याच वेळांत दोघेहि बाजूचें जग विसरले. जणुं नाटकाची चक्रीतालीमच सुरू झाली होती. ते एकमेकांच्या फर्माच जणुं पाट म्हणवून घेत होते, आणि आम्ही इतर प्रेक्षक विंगमधून बघत होतों. श्री. जोशी यांच्या नाट्यरसानुकूल चेहऱ्याबद्दल त्यांनी त्या बैटकींत इतक्या वेळां उच्चार केला की जणुं तानेचा पलटाच ते पुन्हा पुन्हा घेत होते.

'—ऐकलत जोशी, तुमच्या भुवया आणि चेहराच बोलतो की तुमच्या अभिनयाबद्दल, छान! केशवरावांच्या भूमिका तुम्ही करता नाही कां! आम्हाला परमेश्वराने थोडें तरी सौंदर्य दिलें असतें तर—पण त्या वाटणीच्या वेळीं आम्ही

कुठेतरी रियाज करीत बसलों असूं. काय मंगरूळकर, खरं की नाही?' मी 'हो' म्हणताच ते म्हणाले—

'या टाळी–'

मीं टाळी दिली. ही नाटकाची स्थायी पुष्कळ वेळ चालली होती. अंतऱ्याला हात घालावा, म्हणून मी म्हणालों,

'पण रामभाऊ, तुम्ही कुठल्या भूमिका करीत होतात गंधर्व कंपनींत—?'

'मी ना?' ते मोठ्याने हंसून म्हणाले,

'–आमचा हा असा रोडका धैर्यधर स्टेजवर आला म्हणजे प्रेक्षकांना किलकिल्या डोळ्यांनी मी कुठे भस्समान होतों की काय हें बघावं लागे—आणि कसलं आमचं काम हो! गाणं म्हणण्यासाठी विश्रांती म्हणून एक दोन वाक्यं म्हणायचीं अन् पुन्हा गाणं आलं की सुरू'—

'–पण तुमचे तालीम मास्तर शिकवीतच असतील की अभिनय तुम्हाला–!' कारण गंधर्व नाटक मंडळीसारख्या कंपनींत रामभाऊंना फक्त गाण्यामुळेच घेतलें असेल असें मला वाटेना.

'हो, तुम्हाला तालमीचीच गंमत सांगतों' असें म्हणून रामभाऊ उभे राहिले आणि विद्याहरणाच्या तालमीच्या वेळचा प्रसंग ते सांगू लागले. नारायणराव राजहंस उर्फ बाल गंधर्व हे तालीम मास्तराची आणि देवयानीची अशा डबल भूमिका त्या दिवशी करीत होते. रामभाऊंनी त्यावेळी म्हटलें तसें शुक्राचार्यांचें भाषण त्यांनी म्हणून दाखविलें—

'–देवयानी सांग! दारू न पिण्याचे हे ढंग तुला कुणी शिकविले? सां ऽ ऽ ऽ ग, कुणी शिकविलें–?'

एक हात कंबरेवर व दुसरा देवयानीकडे करून त्यांनी हा प्रश्न विचारला. नारायणराव तालीम मास्तराच्या भूमिकेवरून म्हणाले,—

'देवा रस नाही आला, बरं, रस नाही आला या वाक्यांत–पुन्हा म्हणा!' पुन्हा उजळणी करूनहि रस येईना. अखेर रामभाऊंनी त्यांना म्हटलें–

'पण! नारायणराव! लोक पैसे देऊन गंधर्व कंपनीचं नाटक बघायला येतात, ते कांही शुक्राचार्यांचं भाषण ऐकायला नाही येत. देवयानी जोपर्यंत स्टेजवर आहे तोवर इतर कुणी पात्रं नाही आलीं तरी–'

'–तरी पण देवा! रस आणायचा प्रयत्न करा–माझ्यासाठी–' नारायणराव म्हणाले,

'—मग आम्हाला मोसंबीचा रस प्यायला द्या आधी—' रामभाऊंनी थट्टेने म्हटलें आणि ते विनोदाचे बोल लगेच खरे झाले. नारायणरावांनी त्यांना पेंपरभर रस पाजला तरी उद्दिष्ट रस त्या वाक्यांत उतरेना. नारायणराव म्हणाले,

' देवा ही भूमिका मामा गोऱ्यांनी केली होती हें लक्षात आणा. अन् त्यांत रस आणा जरा—'

—' पण नारायणराव—'

' देवा तुम्ही केशवराव भोसल्यांचे पट्टशिष्य! दोन दोन तंबोरे घेऊन बैठकींत गातां. तुम्हाला आम्ही काय सांगावं—! पण तुमच्या आवाजांतला रोष जरा कमी करून थोडा रस आणा देवा! रा ऽऽ म, अरे गंधर्व कंपनीचं नाटक म्हणून लोक बघतील ना!'

नारायणराव अगदी कळवळून सांगत होते. आपला मुद्दा रामभाऊंना पटावा या आत्यंतिक इच्छेने ते आर्जव करीत होते.

'—मग—' रामभाऊ जरा चिडूनच म्हणाले, ' नाना,—तुम्हीच म्हणून दाखवा की, म्हणजे तसा प्रयत्न करीन—'

नारायणरावांनी आपल्या लाडिक लवचिक आवाजांत, हनुवटी वेळावीत—भामिनीच्या ओटांनी तें वाक्य म्हटलें. उजव्या हाताचा आंगठा मुडपून, हात पुढे करून पायाच्या चवड्यावर नाचत, नारायणराव म्हणाले,—

' देवयानी ! अग देवयानी ऽ ऽ सांग. दारू न पिण्याचे हे ढंग तुला कुणी शिकविले ऽ सांग ऽ ! कुणी शिकविले ऽ ऽ सांग, सांग ऽ— ' आणि, 'बघाहं नारायणराव—' असें म्हणून रामभाऊंनी तें वाक्य सहि सहि तसेंच म्हणून दाखवितांच नारायणराव म्हणाले,

' पण देवा ! ही तर आमची नक्कल झाली. '

' आम्ही त्या आठवणीने पोट धर धरून हंसलों. रामभाऊंनी हा साग संवाद इतक्या उत्कृष्ठ रीतीने म्हणून दाखविला की, आम्हाला वाटलें आम्ही विद्याहरणाची तालीम बघत होतों अन् नारायणराव तालीम घेत होते. रामभाऊंच्या अभिनय कौशल्याची चुणूक आम्हाला दिसली ती अशी !

ज्यांच्या बैटकी हटकून यशस्वी होतात अशा भाग्यवंत गायकांपैकी रामभाऊंना मी समजतों. या त्यांच्या संगीत बैटकी प्रमाणेच, त्यांच्या 'प्रोज' बैटकीहि हटकून रंगतात. उच्च शिक्षणाचा गंधहि त्यांना नाटक कंपनीच्या आयुष्यामुळे लाभला नसला तरी, गंधर्व कंपनी, ललितकला वगैरे श्रेष्ठ कंपन्यांतून त्यांचा काळ गेल्यामुळे त्यांना एक प्रकारची गोष्टी वेल्हाळपणाची कला सहज साध्य झाली आहे. वसंतराव देसायांप्रमाणे अर्थातच त्यांच्या गप्पांचा वार्ट.स्वर म्हणजे नारायणराव राजहंस. त्यांच्याविषयी गोष्टी सांगत असतांना ते कितीदा गहिंवरून येतात. आपल्या अत्यंत थकल्या काळांत देखील गानसम्राट मरहूम अल्लादिया खांसाहेब बालगंधर्वांचें गाणें ऐकावला नाटकाला येऊन बसत. त्या आठवणी सांगतांना रामभाऊ फार तल्लीन होतात. नारायणरावांविषयीं वाटणाऱ्या आत्मीयतेमुळे त्यांत एक प्रकारची आकर्षक भरच पडत असते. भामिनीच्या प्रवेशांत नारायणराव स्टेजवर येत त्यावेळी, त्यांच्या जॉर्जेटच्या येणारा अत्तराचा मस्त सुगंध लुटण्यासाठी, आपण विंगमध्ये कसें लुडबुडत असूं, याच्या फार मजेदार गोष्टी ते सांगतात.

अशीच एकदा आमची गप्पांची बैठक रंगली होती. सवाई गंधर्वांचे शिष्य श्री. भीमसेन जोशी व नागपूर नभोवाणीचे तबलावादक श्री. बाळासाहेब आठवले हेहि त्या बैठकीस हजर होते. आमच्या बैठकीचा स्थायीभाव अर्थातच नारायणराव होते. बालगंधर्वांच्या दिलदारपणाचें कौतुक ते वेगवेगळ्या प्रकारांनी सांगत होते. कंपनींत भोजन प्रसंगीं मंडळीची आंबे खाण्याची इच्छा पाहून २५० रुपयाचे आंबे त्यांनी खाऊ घातले. ही आठवण सांगून, नारायणरावांच्या हल्लीच्या परिस्थितीची आठवण येऊन, रामभाऊंना एक क्षणभर गहिंवरल्या सारखें झालें. ते एक मिनिट स्तब्ध राहिले व मग हळूच म्हणाले—

'मंडळी ! माफ करा. नारायणरावांची आठवण आली. एक पद म्हणून दाखवितों—

सीताकांत लाडांच्या खोलीतील पलंगरूपी स्टेजवर बसून रामभाऊंनी एक छोटीशी तान घेऊन तारषड्ज मिळविला—'

'गमपधनिसां—ऽ ऽ' आणि एक हात कानावर ठेवून ते गाऊ लागले—

"दया छाया घे ऽ ऽ—निवारोनी ऽऽऽ यां प्रभू मजवरी कोपला—"

'कोपला' मधील 'ला' वर सम येताच त्यांनी डोळे किलकिले करून भीमसेन जोशी आणि बाळासाहेब आठवले यांचेकडे पाहिलें. तीच ही नजर, की जी नजर, पद सुरू होतांच नारायणराव एका काळीं तिरखवा आणि कादरबक्ष यांचेवर खुणेदाखल टाकीत असत. त्या दोघांनी बसल्या ठिकाणीच खुर्च्यांच्या हातावर एक मुखडा मारून बोल पकडला—

'कत्ना किड्नग्, तातिर् किड्नग्, तिरकिड् तकता तिरकिडधा, तिर्किड् तकता तिर्किड्धा, तिरकिड् तकता तिरकिड धा—धीं, धा धा तिं—'

त्या निःशब्द बोलांनी आमच्या देखील अंगावर क्षणभर रोमांच उभे राहिले. साथीला नाही तंबोरा, ना तबला, की सारंगी—!! पण आम्हांला कुठेंहि खटकलें नाही. जणु तिरखवांचा डग्गा घुमत होता आणि कादरबक्षांची सारंगी 'दयाऽछाया ऽ ऽ' करीत होती. पंधरावीस मिनिटें ती गान समाधी लागली होती. सुरेलपणाचें साम्राज्य सुरू झालें म्हणजे, या बाह्य उपाधींची मुळीच जरूरी भासत नाही. नाराणरावांच्या निरनिराळ्या हरकती त्यांच्या तोंडून निघून, त्यांची ओळख पटतांच आमच्या तोंडून 'वा,वा' शिवाय दुसरें शब्द बाहेर पडणें शक्य नव्हतें. बालगंधर्वांना आम्ही अलिकडे म्हणजे त्यांच्या उतार वयांतच पाहिलेलें. पण श्री. लाड म्हणजे बालगंधर्वांच्या जणु परिवारापैकीच एक. त्यांना या पुनः प्रत्ययाचा आनंद किती झाला असेल, हें त्यांच्या मुद्रेवरून सहज ओळखता येण्यासारखें होतें.

ती चीज संपताच 'मम आत्मा गमला' हे पद सुरू झालें.' 'आत्मा' पैकी 'आ' वर वेगवेगळ्या प्रकारच्या हरकती घेत, रामभाऊंच्या मुखीं, नारायणराव गात होते. विशेषतः 'आ' या शब्दावर दीर्घकाळ आवर्तन घेऊन

त्या प्रकाराने ‘ मम आ ऽ ऽ ऽ त्मा गमला—’ या शब्दपंक्तींना ते तीव्र वेळून समेला येऊन मिळत तेव्हा तर नारायणरावांचा भास फारच स्पष्ट होत असे.

रामभाऊंचा आवाज रुंद आहे. दीर्घ मेहनतीने आणि खर्ज भरण्याच्या सतत अभ्यासाने त्याचा दमसासपणा वाढला आहे. एखादे दिवशी सकाळीं रामभाऊ भेटले म्हणजे विचारावं,

‘ काय रामभाऊ, कुठून आलांत—?’

‘ कांही नाही. आताच बाहेर पडलों. बाबूरावजींच्याकडे तिसरा मजला मिळाला आहे मोकळा. फक्त कांही नाही, अशीच तास खर्ज भरला आणि जरा वर तारसप्तकांत मोकळा फिरून आलों.—’

ग्वालेर दरबार गायकाची नोकरी सोडून रामभाऊंना इतकीं वर्षें झालींत, पण त्यांची मेहनत सुटली नाही. म्हणूनच त्यांच्या आवाजाला नखरे करावे लागत नाहीत. एखाद्या जातिवंत अश्वाप्रमाणे, त्यांचा आवाज सदा तयार असतो. फक्त टांच मारायचा अवकाश की चाल सुरू. त्यामुळेच वर सांगितलेल्या समय-स्फूर्त बैठकी देखील रंगतात.

त्यांनी थोड्या वेळाने ‘ निंदिया आई रे—’ ही भैरवीतील ठुमरी सुरू केली तेव्हा, तर त्यांच्या या गुणाची ओळख विशेष प्रकर्षाने झाली. त्यांच्या आवाजात असलेलें खारीचें चापल्य, मुक्तहस्ताने मोत्यांची उधळण करावी त्या-प्रमाणे तानांची फिरत, अंतःकरणाला चिमटा घेण्याइतपत एखाद्या स्वराला हलवीत ठेवण्याचें कसब सर्व अजब आहे. ज्या आवेशाने ते खर्ज भरतात, त्याच अभिनिवेशाने ते गरगर करीत तार सप्तकांच्या अंतराळांत फिरून येतात. उन्हाळ्यांत चक्रीवादळ सुरू झालें म्हणजे गोल गोल फिरणारी वावटळ भूभागापासून सरळ फिरत अंतरिक्षांत जाते त्याप्रमाणे त्यांच्या तानेची ठेवण आहे. ख्यालाची गायकी कंठगत करून देखील, त्यांच्या गायकीत रुक्षता आली नाही. बरीच वर्षे ग्वालेरला काढूनहि त्यांनी आपली ललित-रम्य गायकी बिघडवून घेतली नाही हें विशेष आहे. श्री केशवराव भोसल्यांच्या शिक्षणामुळे त्यांच्या गळ्यांत, श्रोत्यांच्या अंतःकरणाची पकड घेण्याची नैसर्गिक तयारी आलेली आहे. स्टेजवर गात असता, थोड्या वेळांत, तयारी बरोबर पहिल्या रांगेतल्या चोखंदळ प्रेक्षकाप्रमाणेच पिटातल्या ‘ पेटल ’ गिऱ्हाइकांची देखील मर्जी सांभाळावी लागते. हें कसब अंगात मुरल्यामुळे त्यांनी बैठकीला प्रारंभ करताच बालगंधर्वांची रुक्मिणी जशी विंगमधील तीन पायऱ्या उतरून स्टेजवर पदन्यास करताच थिएटर भर अत्तराचा घमघमाट उधळीत असे, त्या प्रमाणे रामभाऊंच्या स्वराविष्कारा बरोबर गाण्याचा आणि त्या त्या रागाचा दरवळ मनाला बेचैन करून टाकीत असतो. आता याच बैठकीचें पहा. ‘ निंदिया आईरे ’ यातील कोमल गांधारावरील ‘ रे ’ या शद्बावरून, शुद्ध आणि कोमल ऋषभ यांची

गोड मिलावण करीत त्यांनी 'रूमझुम' या शद्बांतील 'रुमऽऽ' या शद्बावरून तानांच्या बारिक गुंडाळया उकलित पंचमाला हळूच गांठलें आणि बरकतअलीखाँ सारख्या पंजाबी ढंगाच्या, डौलदार हरकती घेत पुन्हा-'आई रे---' वर सम धरला. भीमसेन जोशी आणि बाळासाहेबांनी लाक्षणिक अर्थाने सुर्चांच्या हातावर वाजविला "धिन्—" पायांतल्या पैंजणांचा रुमझुम आवाज करीत येणाऱ्या निद्राराणीचें वर्णन किती यथार्थ रीतीने ते करीत होते. डोळ्यांच्या खिडक्या अर्धवट उघड्या होत्या. रुमझुम झुमझुम हलुंहलू टेक्यांत तिचीं पावलं वाजूं लागलीं. डोळ्यावर हळूंच फुंकर घातल्या गेली-आणि 'निंदिया आईरेऽऽरुमझुम—'आमच्यावर देखील जणु तोच प्रयोग होत होता! हिप्नॉटिझम करणाऱ्याने हातवारे करून कृत्रिम झोप आणावी त्याप्रमाणे रामभाऊंच्या "निंदिया"चें 'रुमझुम' आमच्या पापण्यांना स्पर्श करीत होतें. रामभाऊ एकाएकी थांबले. तपोमग्न विश्वामित्राला एखाद्या मोहिनीनें जागे करावें त्याप्रमाणे आमची गानसमाधी भंगली. समोर पाहिलें. चहाचा कप आला होता. साखरेबरोबरच आम्ही विरघळलों. मी उतावीळ होऊन रामभाऊंना म्हटलें—

'रामभाऊ अंतरा नाही म्हटलांत!'

"अहो पूर्ण चीज म्हणता आली तर आम्ही कसले गवई, द्या टाळी" म्हणून रामभाऊंनी हात पुढे केला-अर्थातच मी टाळी दिली हें काय सांगायला पाहिजे! तबल्याच्या वारंवार येणाऱ्या समेप्रमाणे रामभाऊंची 'द्या टाळी' वारंवार येते. सहसा गप्पाचें कुठलेंहि आवर्तन खाली जायचें नाही. टाळया देण्याच्या आणि घेण्याच्या बाबतींत मास्तर कृष्णरावांचें महाराष्ट्र-प्रसिद्ध वेड आम्हांला ज्ञात होतें. रामभाऊहि त्यातलेच आहेत हें पाहून मन जरा अधिक चौकस झालें. वाटलें, गंधर्व कंपनीच्या सर्वच गायक नटांना मास्तरांनी चाली बरोबरच हा गुणहि बहाल केला आहे की काय!

एखादा नवीन श्रोता बैटकीस असला, अन् त्याने टाळीची टाळाटाळी केली तरी त्यांचा अवसानघात होत नाही. एखाद्या कसबी जादुगारासारखी ते हटकून टाळी घेतातच. तब्येतदार गायकाचें खरें गाणें ऐकायचें असलें तर त्याच्या मनाप्रमाणेच त्याला गाऊ दिलें पाहिजे. उत्कृष्ट कलेचा आविष्कार हा हृदयातूनच होत असतो. तिरखवांच्या एका खासगी बैठकींत, मध्येच एकाने रूपक तालाची फर्माईश करून बैटकीचा आणि ऐकणाऱ्यांच्या मनाचा विचका केल्याची माझी आठवण ताजीच आहे. श्रीमंत बाबूराव देशमुखांसारख्या रसिकाकडच्या खासगी बैठकींत ही शिस्त विशेष कटाक्षाने पाळण्यांत येते याचें कारणहि हेंच.

या दृष्टीने रामभाऊंची डॉ. दामले यांच्याकडे दुसऱ्यांदा झालेली बैठक माझ्या मनांत चिरंतन राहील. त्याला इतरहि कारणें आहेत. आत्मस्तुतीचा आरोप पत्करूनहि खरें तें मला सांगायला हरकत वाटत नाही. रामभाऊंच्या मागे तंबोऱ्यावर बसायला मला मिळालें होतें. रामभाऊ कुणाला गाऊं देत नाहीत

हें मला ज्ञात होतेंच पण त्यांच्याच प्रोत्साहनाने मी तोंड उघडलें. आणि त्यांच्या "आपल्या आवाजीचा धर्म सुरेल आहे-" या प्रमाणवाक्याने मला धन्य वाटलें. मागे बसणाऱ्याला गाण्याची मजा विशेष चाखता येत नाही पण त्या दिवशीं मी विशेष खुशीत होतों.

ती बैठक अगदी खासगी स्वरूपाची होती. रामभाऊंची नागपूरांतील मित्र-मंडळी त्यादिवशीं हजर होती. शुद्ध कल्याणचा ख्याल गायल्यावर, त्यांनी आपल्या पेटंट पदांना हात घातला. गोविंदराव टेंब्याचें 'प्रेम हें नितांत तुझें' 'प्रियतमे बोल', 'मम आत्मा गमला' आणि कांही दिवसापूर्वी नभोवाणीवरून म्हटलेलें 'चंद्रिका ही जणुं' ही पदें छान म्हटलीं. लक्षात राहण्यासारखी उत्कृष्ट बंदेशी चीज म्हणून 'पापी पिया दिया ना जलाये' ही खंबावती मधील चीज नवीन ऐकायला मिळाली. या चिजेचें तोंड गझलाच्या धर्तीचें असून अवरोहांत व षड्जावर येताना रागाचा आविर्भाव येतो. 'इमसे करत नित नये ढंग' ही ओळ म्हणून पुन्हा तोंड घेतांना फार मजा येई आणि तिरखवांच्या सारखा तबलजी असता तर अशावेळी कशी धमाल उडवून देतां याची नुसतीच कल्पनाच करावीशी वाटे. आणि शेवटची भैरवी तर अप्रतिमच होती. 'कछु कहे न गयेऽ समझाये;' किती आर्तता आहे या ओळींत ! त्या रामभाऊंच्या तोंडूनच ऐकायला हवी. "कहे" आणि 'गये' या दोन्ही शद्बांना आळवितांना कोमल गांधार, शुद्ध आणि कोमल ऋषभ या तिन्ही स्वर समुदायावर ते अशीं नाजूक आंदोलनें आणि कंप घेत की एकदम कारुण्याचा आविष्कार व्हावा. 'समझाये' तील 'झा' वर कोमल धैवतावर कंपन घेऊन, किंचित वक्र होऊन कोमल गांधारापासून मींड घेऊन पंचमावर न्यास केला तेव्हा पूर्ण श्वास घेतल्यासारखें वाटे. तो पर्यंत श्वसन देखील थांबलेलें ! भैरवीसारख्या रागांत कारुण्य आणि इंटगार या दोन्ही भावनांचा खेळ सारख्या कुशलतेने करता येतो. विरहिणीचें चित्र त्यादिवशी रामभाऊंनी ती ठुमरी म्हणून सार्थ रीतीने उठविलें. कुमार गंधर्वाला हीच चीज म्हणताना ऐकलें होतें. पण रामभाऊंच्या गळ्यांतला दर्दभरीला आवाज कांही वेगळाच.

अंतःकरण भरलेल्या स्थितींत आम्ही त्या बैठकीतून उठलों. संगीत मैफली रंगल्या तर विशेष नाही. कारण त्यासाठी त्यांनी आपली उमर वेच केली आहे. पण त्यांच्या सहज स्फूर्त बिनसाथींच्या करुणानिर्भर बैठकी ज्यांना ऐकायला मिळाल्या असतील त्याचें भाग्य खरोखरच हेवा करण्यासारखें आहे नाही ?

शुभकामना—

'युगवाणी' चें संपादकत्व तुमच्याकडे आलें याबद्दल 'युगवाणी' चें अभिनंदन ! 'युगवाणी' साठी लेख वर्षोलाच माझेकडून घ्या. लेखांचीं इतकीं वचनें उभीं आहेत कीं कर्ज बाजाऱ्यासारखी माझी स्थिति झाली आहे.

—काका कालेलकर

श्याम !

☆

(१)

तुझ्या दर्शनासाठी मी किति आतुर आहे ! सुंदर सुंदर फुलांची माळ गुंफून मी तुझ्या मंदिराजवळ येतें आणि मला दारावर अडवितात तुझे पुजारी अन् माझी माळ हिरावून हंसूं लागतात मिस्किलपणे !

कोण उन्मत्त आहेत मेले !

पण माझी आशा अभंग आहे!

युगायुगांना साक्षी ठेऊन ही मी उभी आहें तुझ्या दारावर.

ये ना श्याम !

चिखलांतून वर येणाऱ्या कमळाला विश्वाचं अफाट अंगण मिळतंच ना फुलायला ?

पृथ्वीच्या अणु अणूंनी वाढविलेल्या या देहाला तुझ्या केवळ स्पर्शानं अनंताचं द्वार खुलं होईल रे !

(२)

चहूकडे गडद अंधःकार होता. भीतीनं माझं अंग थरथरत होतं, प्रकाशासाठी मी सारखी धडपडत होतें.

मी तुला आळवूं लागल्यें, मला आशा वाटूं लागली. रात्रींतून तुझ्या स्पर्शानं कळ्या विकसून त्यांचीं फुलं होतात, वेली फलांनी भारावून जातात. उजाडल्यावर तीं माझ्या दृष्टीस पडतात येवढेंच !

याहि अंधाऱ्या रात्रींत तूं असलंच कांहीं घडवीत असशील नाही ?

मग पहाट फुटतांच माझ्याहि आशेचा मूर्तिमंत महाल मला उभा दिसणार नाही कां रे ?

— क्रांतदर्शी बुधे

शुभकामना—

"युगवाणी" ला मी आशिर्वाद काय देणार ? तुमच्या संपादकत्वाखाली तिचा उत्कर्ष होवो आणि मध्या युगांतील विदर्भाचा आत्मा तिच्या द्वारे प्रकट होवो असें मी इच्छितों.

—श्री. ना. बनहट्टी

अनुक्रमणिका

१९४९
डिसेंबर

हें असें विपरीत घडलें !

काय लिहावयाचें आणि कसें लिहावयाचें ! लेखणी चालूं शकेल कारण तिला हृदय नाहीं. पण ती चालविणारा हात, त्याची सर्वच शक्ति गोठल्यासारखी झाली आहे !

प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी ता. २५ नोव्हेंबर दुपारीं चार वाजेपर्यंत आमच्यांत होते आणि आज ते नाहींत, होते आणि नाहींत, या दोन वाक्यांत प्रकट झालेल्या वस्तुस्थितींत केवढें अनिष्ट साठवलेलें आहे ! दुपारीं बारा वाजेपर्यंत सरचिटणीस म्हणून त्यांनी विदर्भ साहित्य संघाचें काम केलें. डॉ. कोल्हटे आणि मला त्यांनी पत्रें लिहिलीं कीं यंदाचें सम्मेलन चांद्याला भरावयाचें आहे. तुम्ही उभयतां कसेंहि करून चांद्याला जाऊन या. तीं पत्रें पोचलीं आणि त्यांच्या मागोमागच ज्याची कल्पनाहि सहन होणें शक्य नाही ती त्यांच्या मृत्यूची बातमी येऊन थडकली. समाज शिक्षणाच्या कामासाठी ते मेहरामच्या यात्रेला कीर्तन करण्यासाठी दुपारीं तीन वाजतां निघाले आणि अमरावतीपासून १८ मैलांवर मोटार अपघात होऊन त्यांचा इहलोकीचा प्रवास संपला !

दिवाणजी म्हणजे धडपड. दिवाणजी म्हणजे तळमळ. दिवाणजी म्हणजे कोणतेंहि काम आपल्या मागे लावून रात्रंदिवस अविश्रांत खपणारें सहृदय यंत्र. दिवाणजी म्हणजे उत्साह, दिवाणजी म्हणजे संस्थांचा आधार. दिवाणजी म्हणजे जीवंतपणा—हें सगळें अर्धें सीमीमध्ये संपून गेलें ! आता निरनिराळ्या संस्थाना कोमावलेल्या वृक्षाप्रमाणे पाणी घालावयाचें झालें तर—? आता नवीन कल्पना अमलांत आणायच्या झाल्या तर—? आता अधिवेशनें भरवायचीं झालीं तर—? आता संस्कृत नाटकें रंगभूमीवर आणायचीं झालीं तर—? तर काय कांही नाही; खरोखरच कांही नाही ! आता प्राध्यापक मनहट्टी, प्रा. कोल्हटे यांनी वेळीअवेळीं हाक मारली तर माणूस नाही. प्रिंसिपल मिराशींना हाताशी धरायला आधार नाही. प्रा. सोमलवारांना कार्य सिद्धीसाठी उत्साह नाही. आता काका सहस्रबुद्धे, डॉ. देशमुख, प्रा. देशपांडे सर्व त्यांच्या घराभोवती भिरभिरतील पण त्यांच्या हांकेला ‘ओ’ मिळणार नाही. ‘युगवाणी’ ला, विदर्भ साहित्य संघाला दिवाणजी गेले. आता खरेंच कुणी कुणी नाही.

आणि दिवाणजींच्या असंख्य मित्रांबद्दल—? आणि दिवाणजींच्या चाहत्यांबद्दल—? आणि—

अनुक्रमणिका

तें त्यांचें घर, तीं त्यांची लहानगीं मुलें, ती त्यांची, त्यांच्या आधारावर, त्यांच्यासाठी रात्रंदिवस खपून, शिणुन, पुन्हा आनंदित राहणारी त्यांची पत्नी-- कोण समजावणार त्यांना ? कोण पुसणार त्यांचीं आसवें ? वडील होते, तें आतां नाहीत. मातोश्री संसाराच्या रगड्याने गलितधैर्य झालेल्या. वडील बंधु बेमुदतीच्या तुरुंगांत—!

मोटारींत बसतांना दिवाणजी सांगून गेले असतील—, "घर सांभाळा, मुलांना जपा. साहित्यसंघाची डाक जपून ठेवा. कुणी आलेंच तर त्यांना सांगा, "दिवाणजी आत्ता परत येतील." घरीं दारीं सर्व चळवळींत गुंतलेलें त्यांचें मन आता कायमचें निःशब्द झालें आहे. कुटुंबाचा आधार गेला. मातेचा हिरा हारपला. मुलांचा पिता गेला. पत्नीचा विसावा गेला. संस्थांचा प्राण गेला आणि या स्वतंत्र देशाच्या आणीबाणीच्या काळांत शक्तीचा कणकण साठविणाऱ्यांची धडपड चालू असतां जीवनाच्या सर्व प्रश्नांचा विधायक रीतीने विचार करून सतत खपणारा अेक उत्तम, उमदा, दिलदार नागरिक गेला !

आता ती मूर्ति दिसायची नाही. आता त्या डोळ्यांतून आशा सांडायची नाही. आता तें कधींतहि न ढळणारें मुखावरील हास्य दिसायचें नाही. लोपलें तें, विरलें तें—विरलें !

काय लिहिणार ? कसें लिहिणार ? ज्यांनी जीवनाला आपल्या त्याग व शक्तीने जिंकलें आहे असे थोर लोक सांगतात की मृत्यूची वेळ शोकाची नसते; चिंतनाची असते. जो आत्मा अपुरें पडलेलें शरीर सोडून जातो तो अनेक शरीरांतून व्यापकपणे संचार करतो. दिवाणजींनी विदर्भसाहित्यसंघाची अिमारत अेका खांबावर हिंमतीने सांभाळली. आता तिची वीट देखील निखळूं न देण्याचें कार्य प्रत्येक सभासदाचें, हितचिंतकाचें आहे. दिवाणजींबद्दल वाटणारी हळहळ, दिवाणजींबद्दल निघणारा उसासा, कार्यांत परिणत झाला तरच मानवसुलभ धैर्य आणि भारतीय संस्कृतीची वारसदारी सांगण्याचें चीज होणार आहे. त्यांची आजवरची कृति, त्यांची उक्ति, त्यांची तळमळ--सर्व व्यापक होवून ज्या ज्या कार्याला त्यांनी हातभार लावला त्या त्या कार्याच्या हितचिंतकामध्ये संचारली पाहिजे. तीच आम्हाला कार्यतत्पर करो !

दिवाणजी गेले आणि तरी ते आमच्यांत आहेत, आमचेच आहेत आणि आमच्यांतच राहतील !

"हा प्राण त्या चैतन्यमय अमृत-तत्वांत लीन होवो. आणि मग शरीराची राख होवो. ईश्वराचें नांव घेवून, हे दृढसंकल्पमय जीवा ! आठव. त्याचें केलेलें आठव. हे (माझ्या) जीवा ! (आपले संकल्प सोडून) त्याचें केलेलें आठव."

—वामन कृष्ण चोरघडे

१९४९
डिसेंबर

कोंदणांत या श्रध्दा माझी

कोंदणांत या श्रद्धा माझी
राहो अक्षय शिशु-हृदयाच्या
निळ्या निळ्या वलयांत चंद्रमा
सोन्याचा जणुं मोर-पिसाच्या.
पीस पारखें संसाराला
पिसाऱ्यांतुनी गळतां होतें,
मोहकतेने साऱ्या तरिही
पडल्या पडल्या हंसत राहते.
हर तत्वाशीं जीवनांतल्या
झाली ताटातूट जरीही
विश्वासाने भरल्या छातींत
ठोकले कुणी खिळे कितीही,
जिवंतता हास्यांतिल कां कधिं
रमणियतेच्या मरेल वेडे !
कधीं न संपायाची ज्यांतिल
मिठास ते मीं बोल बोबडे.

—वसंत हजरनीस

खेळणीं

फांदी घेउन मोडकी, धुलिकणीं तूं राहशी खेळत
बाळा ! संततरे, प्रभातसमयीं, होशीं किती हर्षित !
हांसें मी तुजला, बघून इवल्या फांदीसवें खेळतां
सारावेळ हिशेब मी जुळवितों, संख्या उणी जोडतां.

पाहोनी मजला, गमे तुजसि कां ? "हा खेळ ऐसा कसा !
वाया सर्व सकाळ मात्र दवडी, ना मोदवी मानसा."
बाळा ! मी भुललों अता तव कला, खेळांत जी रंगवी
साधीं मृण्मय, लाकडीं न मजला चित्रें अजी हर्षवी.

थाटाचीं नव खेळणीं—रजत नी सोनें घरीं आणतों,
हातीं येईल त्यासवें विहरुनी आनंद तूं मानतो ;
शक्ती आणिक काल मात्र दवडीं मी व्यर्थ शोधावया-
वस्तू, ज्या असती अलभ्य जगतीं अर्थांध दृष्टीस या.

नौका भग्न जरी, तरी धडपडे उल्लंघिण्या वासना
होतों मग्न यदा, सदा विसरतों मीही करी क्रीडना.

—दा. ल. अडोणी.

[गुरुदेवांच्या 'प्ले थिंग्ज'वरून.]

दुखवटा

विदर्भ साहित्य संघाचे सर चिटणीस प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी यांच्या आकस्मिक मृत्यूची वार्तेमी आज अनपेक्षित समजली. काल ते समाजशिक्षणाच्या कार्यासाठी बेहरामच्या जत्रेला जात होते व मोटार अपघातांत त्यांचें अवसान झालें. विदर्भ साहित्य संघाचे ते आधारस्तंभ होते. त्यांच्या मृत्यूने सा. संघाची कधीहि न भरून येण्या इतकी हानि झाली आहे. त्यांच्या मागे त्यांचीं पांच मुलें, वृद्ध मातोश्री, स्थानबद्ध बंधु आणि त्यांच्या कष्टाळू पत्नी, यांच्यांवर काय प्रसंग आला याची कल्पनाहि करवत नाही. त्या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोंत. हा धक्का सहन करण्याची ईश्वर त्यांना शक्ति प्रदान करो !

नागपूर ता. २६-११-४९

—वा. कृ. चोरघडे
उपाध्यक्ष, वि. सा. संघ.

विदर्भ साहित्य संघ, परीक्षा समिति

१. यापुढील परीक्षा ता. ७, ८ व ९ जानेवारी १९५० रोजीं होतील. परीक्षांचा कार्यक्रम पुढे दिलेला आहे.

शनिवार ७ जाने. १९५०	साहित्य पारंगत	प्रश्न पत्रिका	१
दुपारीं ३ ते ६	साहित्य-स्नातक		१
रविवार ८ जाने. १९५०	साहित्य पारंगत		२
सकाळीं ८ ते ११	साहित्य स्नातक		२
	साहित्य परिचित		१
	साहित्य विनीत		
	मराठी प्रवेश (लेखन)		
दुपारीं ३ ते ६	साहित्य पारंगत	प्रश्नपत्रिका	३
	साहित्य स्नातक		३
	साहित्य परिचित	,,	२
	मराठी प्रारंभ	(मौखिक)	
सोमवार ९ जाने. १९५०			
सकाळीं ८ ते ११	साहित्य पारंगत	प्रश्नपत्रिका	४
दुपारीं ३ ते ६	साहित्य पारंगत		४

२. परीक्षांचे अर्ज, केंद्रव्यवस्थापकांच्या द्वारा नागपूर कचेरीकडे पाठवण्याची शेवटची तारीख १५ डिसेंबर १९४९ ही आहे.

३. परीक्षा पुढील गावीं केंद्रस्थानीं होतील. केंद्रस्थानांपुढे केंद्रव्यवस्थापकांचीं नांवें दिलीं आहेत.

(१) अमरावती ... श्री. द. शं. फडके. मुधोळकर. पेठ.
(२) आकोट ... श्री. भा. व. भेंडे. श्री शिवाजी हायस्कूल.
(३) आर्वी ... श्री. एच. डी. सगणे. मॉडेल हायस्कूल.
(४) एलिचपूर ... श्री. मो. ग. रिंगणगावकर. सिटी हायस्कूल.
(५) कारंजा ... श्री. मो. वि. फुरसुले. कंकुबाई विद्यालय.
(६) गोंदिया ... श्री. ना. ग. डबीर. सिव्हिल लाइन्स.

(७) जबलपूर ... श्री. द. कृ. पाठक. ३१३/४. गोळबाजार.
(८) नागपूर प्रा. अ. ना. देशपांडे. धंतोली.
(९) नांदुरा श्री. म. के. राजूरकर. हायस्कूल.
(१०) बुलडाणा ... श्री. द. ह. अग्निहोत्री. नॉर्मलस्कूल.
(११) भंडारा ... श्री ज. रा. गोडबोले. सरकारी हायस्कूल.
(१२) मलकापूर श्री. वा. स. पानट. हायस्कूल.
(१३) यवतमाळ श्री. शं. द. मेलग. अवधूतवाडी.
(१४) वरूड श्री. व्यं. ग. ताकोडे. मॉडर्न हायस्कूल.
(१५) वर्धा श्री. ब. प. तांदळे. रामनगर.
(१६) सागर ... प्रा. दा. ल. अडोणी. सागर विद्यापीठ.
(१७) हिंगणघाट श्री. रा. वि. करपे. रॉबर्टसन हायस्कूल.

याशिवाय आकोला (श्री. प्र. ना. खोडे.) व दारव्हा (श्री. शं. व्यं. फाटे) येथेहि केंद्र उघडण्याचा विचार चालू आहे. उमेदवारांनी आपापल्या गावच्या केंद्रव्यवस्थापकाकडे चौकशी करून त्यांच्यामार्फत अर्ज पाठविणें सोयीचें होईल.

४. नागपूर येथील भारतीय भाषाध्ययन मंदिर, महाल नागपूर, या संस्थेला मान्यता देण्यांत आलेली आहे. तेथे वि. सा. संघाच्या सर्व परीक्षांचे शिक्षण विना-शुल्क देण्यात येतें. मंदिराचे कार्याध्यक्ष श्री. माणिक बैतुले, महाल नागपूर. यांच्या-कडे नागपूरच्या उमेदवारांनी चौकशी करावी व या अध्ययन मंदिराचा अवश्य फायदा घ्यावा.

५. नागपूरप्रमाणेच नांदुरा, वर्धा, वरूड, हिंगणघाट वगैरे ठिकाणीहि परीक्षांचे वर्ग चालविण्यात येतात. गेल्या महिन्यात वरूड, वर्धा, आर्वी इत्यादि ठिकाणी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे अर्पण करण्याचे समारंभ अत्यंत उत्साहाने साजरे झाले. हा उत्साह वाढवण्यासाठी सर्व मराठी भाषा व वाङ्मयप्रेमी सज्जनांनी परीक्षा समितीला साह्य करावे ही नम्र विनंती.

धंतोली, नागपूर १.

वि. भि. कोलते.
संचालक
वि. सा. संघ परीक्षासमिति.

संघवार्ता

विदर्भ साहित्य संघाची यंदाची निवडणूक

विदर्भ साहित्य संघाची यंदाची निवडणूक डिसेंबर १९४९ च्या अखेरच्या आठवड्यांत होईल. मतदारांच्या याद्या ता. १ डिसेंबर १९४९ रोजीं प्रसिद्ध होतील. पुढे दोन-तीन दिवसांत मतपत्रिका व याद्या सर्व सभासदांकडे रवाना होतील. ता. २० डिसेंबर १९४९ रोजीं अमरावती येथे मध्यवर्ती कार्यालयांत मतमोजणी होईल.

यंदाचें विदर्भ साहित्य संमेलन

यंदाचें विदर्भ साहित्य संमेलन डिसेंबरच्या शेवटल्या आठवड्यांत भरविण्याची खटपट कार्यकारी मंडळ करीत आहे. वि. सा. संमेलनाच्या ठिकाणासंबंधीची आणि त्याबाबत इतरहि सर्व प्रकारची माहिती देणारीं पत्रकें प्रांतांतील सर्व वृत्तपत्रांत लवकरच प्रसिद्ध होतील. वि. सा. संघाच्या सर्व सभासदांनी संमेलनाला उपस्थित राहून आणि इतरहि सर्व सहकार्य देऊन कार्यकारी मंडळाला उपकृत करावें. यंदाच्या संमेलनाच्या वाटाघाटी या आठवड्यांत पूर्ण होतील.

यंदाच्या निवडणुकींत निवडून येणाऱ्या नवीन अध्यक्षांना येत्या संमेलनांतच जुन्या अध्यक्षांकडून अधिकारप्रदान करण्यांत येईल. जानेवारी १९५० पासून नवीन कार्यकारी मंडळाची कारकीर्द सुरूं होईल.

सभासदांना विनंती

ता. १ डिसेंबर १९४९ रोजीं प्रसिद्ध होणाऱ्या सभासदांच्या यादींत समाविष्ट झालेल्या सर्व सभासदांची वर्गणी डिसेंबर १९४९ अखेर संपेल. 'युगवाणी' च्या सोयीसाठीं सर्व सभासदांची वर्गणी जानेवारी १९५० मध्येच मध्यवर्ती कार्यालयांत जमा होणें आवश्यक आहे. त्यामुळे सभासदांची संख्या बरीच निश्चित होईल. तरी सर्व सभासदांनी जानेवारी १९५० च्या १५ तारखेपर्यंत आपली वर्गणी रु. ३ (तीन) मध्यवर्ती कार्यालयाकडे स्मरणपूर्वक पाठवावी अशी विनंती आहे. ज्या सभासदांची वर्गणी जानेवारी १९५० मध्ये जमा होणार नाही त्यांच्याकडे फेब्रुवारी १९५० चा 'युगवाणी'चा अंक व्ही. पी. ने रवाना होईल. तरी फेब्रुवारीच्या अंकाची व्ही. पी. स्वीकारण्याची कृपा करावी. नवीन वर्षाच्या वर्गणीबाबत योग्य वेळीं सर्व सभासदांकडे सूचना रवाना होतीलच.

ना. कृ. दिवाणजी
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

 १८-११-४९

सरकारी वा निमसरकारी संस्थांचें जें काम चालतें, त्याच्या प्रेरकशक्ति सत्ता किंवा प्रलोभन या असतात. त्यांच्या द्वारा केवढेंहि काम झालें, तरी त्याच्या योगाने लोकांची दानत, त्यांची सामुदायिक इच्छाशक्ति यांची वाढ होत नाही. याच्या उलट लोकांच्या इच्छेने निर्माण झालेल्या संस्थांचा आधार लोकहितबुद्धि हाच असूं शकतो. अशा संस्थेमध्ये चारच लोक, जमले, तरी ते लोकहितबुद्धीने, स्वयंप्रेरणेने जमलेले असतात. या स्वयंप्रेरित कार्यशक्तीच्या योगाने समाजाची दानत वाढते, त्याच्यांत चैतन्य वें प्रगतीची इच्छा निर्माण होते. या संस्थांचें काम समाजजीवनाच्या उन्नतीच्या दृष्टीने, ' यत्स्वल्पमपि तद्बहु ' असें असतें.

—श्री. ना. बनहट्टी

अनुक्रमणिका